नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वती जन्मभू

मार्च १९६०

ंकातील लेखक व कवि

पु. य. देशपांडे
बाबा मोहोड
रामदास सेलूकर
वसंत वि. साखरकर
राजा मुकुंद
नी. र. वऱ्हाडपांडे
डॉ. वा. वि. मिराशी
ना. रा. शेंडे
या. मु. पाठक

...ा ॥१०॥

मूल्य ८ आणे

युगवाणी

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेलें)

युगवाणी

संपादक-मंडळ

संपादक : पु. य. देशपांडे
सदस्य गो. रा. दोडके
प्र. वा ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

मार्च १९६०

कविता

लेख

ण

कथा

* *

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

कला : जीवन : समीक्षा

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

वर्ष १४ | अंक १२
मार्च १९६०

क वि ता

जीवनाचे गुह्य

पु. य. देशपांडे

भूत नि भविष्य । तलवारी ह्या दोन ।
मानवांची मान । त्यांच्यामध्ये ।।१।।

कापिती त्या सदा । मानवांचे गळे ।
रक्ताचे थारोळे । चोहीकडे ।।२।।

थारोळे रक्ताचे । सदा दुर्लक्षित ।
म्हणून आम्ही भक्त । तलवारींचे ।।३।।

भूत तलवार । भविष्य तलवार ।
वर्तमान ठार । जीवनाचा ।।४।।

वर्तमान होता । जीवन सर्वस्व ।
ठरे भूत, भविष्य । भुताटकी ।।५।।

वर्तमान होता । विचाराचे लक्ष्य ।
होते जे अलक्ष्य । येई ध्यानी ।।६।।

भविष्य मागतो । आजच्याचे दान ।
उद्या सर्व छान । उधारी ही ।।७।।

भूतहि मागतो । आजच्याचे दान ।
जित्यांचे मरण । प्रेतापायी ।।८।।

भूत नि भविष्य । स्वप्नांची खिल्लारे ।
वांझेची ही पोरे । मृगजळी ।।९।।

भूत, भावी खोटे । वर्तमान खरा ।
सत्याचा गाभारा । क्षणोक्षणी ।।१०।।

क्षण विद्युल्लता । वज्र ते काळाचे ।
सर्व भक्ष्य त्याचे । क्षणिक जे ।।११।।

क्षणाच्या गाभारी । होळी क्षणिकांची ।
मूर्ति शाश्वताची । झळाळते ।।१२।।

शाश्वताचे भान । नेत्र हा तृतीय ।
दिक्काल आशय । तोचि पाही ।।१३।।

जीवनाचे गुह्य । त्यालाच आकळे ।
अन्य सर्व चाळे । भ्रमिष्टांचे ।।१४।।

* *

स्मृति

वाचा मोहोड

अशीच होती वाट चिमुकली
असाच होता गंधित वारा
पांघरून क्षितिजाला होती
अशिच उभी शुक्राची तारा

असाच होता कर्डुनिवाचा
कुठे जरासा लवला डोळा
असाच होता दूर उसासा
ध्ययेत पिचलेला पाचोळा

सभोवताली अशीच होती
मुक्त उधळली हिरवी शाई
अशीच होती शेवंतीसहि
लाजायाची झाली घाई.

असाच होता धुंद गारवा
असेच होते लहरत पाणी
तुझ्या स्मृतीने तेव्हा नव्हती
ओली पण ही खुळी पापणी

* *

लेणे !

रामदास सेलूकर

का कोरलेस तू
तुझ्या नेत्र कटाक्षांनी...
तव आत्मीय-सौंदर्याचे अजिंठा-लेणे !
माझ्या मनाच्या शशीवेड्या सागर-लाटांवर !!

विरघळायला हवे होते
इंद्रधनुष्यातील रंगाप्रमाणे
माझ्या आशा-स्वप्नांचे अभंग
तुझ्या जीवनाच्या इंद्रायणीत !!...

सदय मृत्यूवाचून
लाभला असता मग
माझ्या शून्याकुल शोकांतिकेला
ध्येयाविहीन सारुप्याचा वैकुंठ !!...

* *

सांभाळून !

वसंत त्रि. सात्तरकर

उधार देवाण
उधार घेवाण
शिरावर भार···निंदास्पद !

चोरून बोलणे
चोरून प्रवेश
अंगचा आवेश···डोळीं भरे

चकडशी झोप
शरीराला त्रास
काजव्यांना भास···प्रेयसीचा !

गोफणीचा गोटा
सहचरा लागे
पक्षीण कांगावे···मृत्यूंजया.

संथ जलाशयीं
मासोळयांचा खेळ
वाटे खोल तळ···जवळचा !

ओळखीचा सूर
ओळखतो नूर
भावना–निर्झर···ओसंडतो.

ओळखून काळ
लोचनांची चाल
कल्पना–महाल···सांभाळून !!

★ ★

भिनतात हेतू !

राजा मुकुंद

घमघमला सुगंध
आले फुलून आकाश
वारा डंखित सुटला
फूलपंखी उच्छ्वास.

झांक माझी चैत्रलज्जा
आवरीता जाते उतू
लावू नको वेळ आता !
डंखी, भिनतात हेतू··!

०

卐

कालिदास आणि शेक्सपियर

नी. र. वऱ्हाडपांडे

अस्पृष्टदोषा नलिनीव दृष्टा हारावलीव ग्रथिता गुणौघैः ।
प्रियाङ्कपालीव निमर्दहृद्या न कालिदासादपरस्य वाणी ।।

प्रथितयश व अधिकारी लेखक श्री. माडखोलकर यांनी अलीकडे संस्कृत नाट्यवाङ्मयात व त्यातल्या त्यात कालिदासाच्या नाट्यवाङ्मयात विविधता कमी आहे, इंग्रजी नाट्यवाङ्मय त्या मानाने कितीतरी अधिक वैचित्र्यपूर्ण व व समृद्ध आहे, असे विधान अनेक वेळा केले आहे. कालिदासाच्या नाटकात शक्सपीअरच्या नाटकाच्या मानाने व्यक्तिचित्रणाचे दुर्भिक्ष आहे, असेहि इतर अनेक लेखकांनी म्हटले आहे. १९२६ सालच्या सुमारास प्रकाशित झालेल्या कानेडकृत टागोरचरित्रामध्ये असे विधान आहे व अलीकडे प्रसिद्ध झालेल्या श्री. कंगले यांच्या 'कालीदासाची नाटके' या पुस्तकात त्याचीच री ओढलेली आहे.

पुनरुच्चाराने कोणतेहि मत सार्वत्रिक होऊ शकते या न्यायाने हे मत सार्वत्रिक होण्याची भीति आहे. तेव्हा ते कितपत खरे आहे याचा विचार केला पाहिजे.

कालिदासाच्या नाटकामध्ये वैचित्र्य किती आहे हे दाखवून द्यायच्या आधी शक्सपीअरच्या नाटकातून मानवी चारित्र्याचे व जीवनाचे सर्वाङ्गीण दर्शन घडते असा जो अनेक वेळा उद्‌घोष करण्यात येतो तो कितपत खरा आहे याची चिकित्सा केली पाहिजे. अशी चिकित्सा करताना शेक्सपीअरची तीनच गाजलेली नाटके घेऊ, (कारण कालिदासाची तीनच नाटके उपलब्ध आहेत). ही तीन नाटके म्हणजे हॅम्लेट, मॅक्बेथ व ऑथेल्लो.

या तीन नाटकातल्या नायकांचे व्यक्तिचित्रण पृथगात्मक आहे असे म्हणता येईल काय ?

मला असे वाटत नाही. हे तीनही नायक एकाच घोरणाने रंगवलेले आहेत. ते घोरण म्हणजे अनेक सद्‌गुणांनी युक्त असा माणूस एखाद्याच दोषाच्या

प्रभावाने आपल्या सम्बन्धी लोकांच्या जीवनाची शोकान्तिका कशी घडवून आणू शकतो हे दाखविणे.

तिन्ही व्यक्तिचित्रणातले धोरण एकच असले तरी त्या व्यक्तींचे दोष निरनिराळे होते. हॅम्लेटची अकर्मण्यता, ऑथेल्लोचा मत्सर व मॅक्बेथचा स्त्रीवशता हा दोष होता व यामुळे या तिघांच्या व्यक्तिचित्रणात पृथगात्मकता आहे असे म्हणण्यात येईल; पण अशासारखेच समर्थन कालिदासाच्या तीन नायकांनाहि लागू होऊ शकेल. पुरूरवा, अग्निमित्र व दुष्यन्त हे तिन्ही नायक प्रणयी राजे या दृष्टीने सारखेच असले तरी त्यांच्या प्रणयाचे स्वरूप पृथगात्मक आहे. पुरूरव्याच्या प्रणयात विप्रलम्भाचे प्राधान्य आहे, अग्निमित्राचा प्रणय अन्तःपुरातील राण्याशी केलेल्या लपंडावाच्या स्वरूपाचा आहे व दुष्यन्ताच्या प्रणयात शापग्रस्ततेमुळे जगाच्या वाङ्मयात लोकोत्तर असलेले वैशिष्टय आले आहे. या शापकल्पनेतूनच फ्रॉइडच्या शेकडो वर्षे आधी सुप्त मनाची कल्पना कालिदासाने नाटयरूपाने सजीव केली.

रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान् ।
पर्युत्सुको भवति यत्सुखितोऽपि जन्तुः ।।
तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वम् ।
भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ।।

पूर्वी अनुभवलेल्या भावनांचा पुनः प्रत्यय यावा, त्यामुळे मन व्याकुळ व्हावे, पण त्या भावना ज्या व्यक्तींच्या व प्रसंगांच्यामुळे उद्भवल्या त्यांचा मात्र विसर पडावा, अशा मनःस्थितीचे चित्रण करून कालिदासाने रंगभूमीवरील मनोमन्थनाचा उच्चांक गाठला आहे. मानवी मनाचा ठाव घेण्याची ही करामत शेक्सपीअरच्या व्यक्तिचित्रणापेक्षा कमी दर्जाची आहे असे प्रामाणिक टीकाकाराला म्हणवणार नाही.

हत्तीवाचून सैन्य

कालिदासाच्या नाटकामध्ये शेक्सपीअरच्या वरील तीन नाटकांच्या मानाने नायिका जास्त प्रधान आहेत. या नाटकात शेक्सपीअरने आपल्या कथानकाचे सारे धागे नायकाच्या भोवती विणले आहेत. त्यातील कोणत्याहि स्त्रीपात्राला नायिका म्हणता येणार नाही. पण कालिदासाच्या मालविका, उर्वशी वा शकुंतला या नाटकाला प्राणभूत आहेत. कथानकाच्या सर्व घटना त्यांच्याभोवती फिरत राहतात. नाटयाच्या केन्द्रस्थानी असणाऱ्या या तीन नायिका एक साच्याच्या आहेत असे म्हणता येईल काय ? विवाहाला जिच्या आयुष्यात स्थान नसते अशी अनेक

पुरुषांचा सहवास घडलेली स्वर्गांगना उर्वशी, दैवयोगाने सवतीची दासी झालेली विवाह हे जिचे सर्वस्व आहे अशी मुग्धा मालविका, व प्रणय आणि विलास यांचा संपर्क न झालेली, तपाचरण व विवाहजीवन यांच्या उंबरठ्यावर उभी असलेली आश्रमवासिनी शकुंतला, ही चित्रे एकाच मुशीतली आहेत असे म्हणणाऱ्यांना 'हरिची अगाध कळली नाही च कारागिरी' असे दुःखाने म्हटले पाहिजे.

कालिदासाच्या व्यक्तिचित्रणातील विविधतेचा मुद्दा आणखी घोळता येईल पण तसे न करता अधिक व्यापक दृष्टीने विविधतेचा विचार करू. व्यक्तिचित्रण हे नाटकाचे प्रधान स्वरूप आहे म्हणता येत नाही. रंगभूमीवरील प्रयोगाने प्रेक्षकांना हलवून सोडणे हे नाटककाराचे प्रधान उद्दिष्ट असते. हे उद्दिष्ट पूर्णपणे साधले तर नाटकात व्यक्तिचित्रण आहे की नाही या मुद्याला महत्त्व उरत नाही. हजारो वर्षे प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या नाटकात व्यक्तिचित्रण नाही म्हणून ते कमी दर्जाचे आहे असे म्हणणे शिकंदराच्या सैन्याने सर्वत्र दिग्विजय केला तरी हत्ती नव्हते म्हणून ते निकृष्ट दर्जाचे मानले पाहिजे असे म्हणण्यासारखे आहे.

प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेण्याचे सामर्थ्य म्हणजेच रसात्मकता हे नाटकाचे सर्वस्व आहे असे भारतीय नाटककारांनी मानले ते सर्वथैव युक्त आहे. या रसात्मकतेच्या बाबतीत कालिदास व शेक्सपिअर यापैकी कुणाच्या नाटकात विविधता अधिक आहे ?

एकटे शाकुंतल घेतले तरी शेक्सपिअराच्या उपरिनिर्दिष्ट तिन्ही नाटकांपेक्षा त्यात रसवैचित्र्य अधिक आहे. हॅम्लेटमध्ये अथपासून इतिपर्यंत हॅम्लेटच्या विषण्ण व्यक्तित्वाची छाया आहे, मॅक्बेथमध्ये, मॅक्बेथच्या अधःपाताची एकसुरी धडधड आहे, व ऑथेल्लोमध्ये ऑथेल्लोच्या राङगडया हर्षामर्षाचें एकताली ताण्डव आहे. पदार्थ वेगळे असले तरी चव एकच आहे. तिन्ही नाटकांचा मनावर परिणाम एकसारखाच होतो. तो म्हणजे एक प्रकारची भयाण विषण्णता निर्माण करणे.

उलट शाकुंतलामध्ये पहिल्या अंकात मुग्ध शृंगाराचे वातावरण आहे, तर सातव्यात संसारतापाने भाजलेल्या दम्पतीचे प्रौढ मीलन आहे. चौथ्या अंकात सर्व आप्तेष्टांचा दुःखभाराने निरोप घेणारी व प्रियकराच्या मीलनासाठी आतुर झालेली नवोढा आहे तर पाचव्यात पतीने धिःकारलेली व आप्तेष्टांनी सोडलेली असहाय अबला आहे. ज्याच्या चिंतनात मग्न झाल्यामुळे दुर्वासाची शापवाणी-देखील ऐकू आली नाही त्याच्यावरच पुढे "अनार्या" म्हणून तुटून पडण्याचा प्रसंग ! 'कन्या सासुरासी जाये' या दृश्याचा परिणाम व प्रत्यादेशाच्या

दृश्याचा परिणाम ! किती जमीन अस्मानचे अंतर ! हे वाचतांना वा रंगभूमीवर पाहताना मंदरगिरीने समुद्राचे मंथन केले तसेच कविकुलगुरु आपल्या भावभावनांचे मंथन करीत आहे असे वाटते.

पदे पदे यन्नवतामुपैति

शकुंतलेप्रमाणेच दुष्यन्ताचेहि दर्शन विविध आहे. पहिल्या अंकात शकुंतलेच्या मुखकमलाभोवती रुंजी घालणाऱ्या भ्रमराचा हेवा करणारा, व तिच्या चिंतनात आलोचन रात्री घालवणारा प्रेमिक, पाचव्या अंकात शकुंतला हे नाव देखील विसरून जातो, व तिच्याविषयीच्या विरहभावना जागृत झाल्या असताना हे पूर्वजन्मीचे अनुभव असले पाहिजेत असे म्हणू लागतो ! शकुंतलेच्या अधरमधूची तहान लागलेला पहिल्या अंकातला कामार्त, सातव्या अंकात अर्भकाच्या अंगधूलीने मलिन होण्यात धन्यता मानतो. व्यक्ति एकच पण प्रसंग वेगळे असल्यामुळे अगदीच वेगळ्या रसाचे आलम्बन होते. हॅम्लेट पाहून उठताना एकप्रकारच्या विषण्णतेने प्रेक्षक भारावलेला असतो. उलट शाकुंतल पाहून उठताना मानवी जीवनाचे समग्र दर्शन झाल्याची कृतकृत्यता त्याला वाटत असते.

रसवैचित्र्याप्रमाणेच प्रयोगवैचित्र्याच्या बाबतीत कालिदासाची नाटके शेक्सपीअरच्या नाटकापेक्षा अधिक समृद्ध आहेत. प्रयोगवैचित्र्य म्हणजे निरनिराळ्या तऱ्हेचे नाट्य रंगभूमीवर दाखवण्यास नाटकात वाव असणे. हे वैचित्र्य अनेक तऱ्हांनी दाखवता येते. पण याचे मुख्य साधन म्हणजे भाषा. सर्व पात्रांच्या तोंडी व एकाच पात्राच्या तोंडी अनेक प्रसंगी एकाच तऱ्हेची भाषा असेल तर नाट्य एकसुरी होते. खडाष्टकातील वक्रतुण्डाच्या तोंडची संस्कृतप्रचुर भाषा काढून तिथे साधे मराठी घातले, किंवा एकच प्यालयातल्या गीतेच्या तोंडची घरगुती स्त्रीसुलभ भाषा काढून तिला बाणभट्टी मराठी बोलायला लावले तर या पात्रांचा प्राणच नाहीसा होईल.

भाषावैचित्र्याच्या बाबतीत कालिदासाची नाटके शेक्सपीअरच्या नाटकापेक्षा, किंबहुना एकंदरीतच संस्कृत नाटके इंग्रजी नाटकापेक्षा जास्त समृद्ध आहेत. एकंदरीत इंग्रजी भाषाच संस्कृत भाषेच्या मानाने एकसुरी व कमी लवचिक आहे. शेक्सपीअर झाला तरी इंग्रजीच्या या वैगुण्यापुढे त्याला हात टेकणे भाग होते. दुसरे, संस्कृत नाटकात पात्राच्या योग्यतेप्रमाणे संस्कृत व निरनिराळ्या प्रकारच्या प्राकृतांची योजना करण्याची परम्परा आहे; यामुळे निरनिराळ्या पात्रांच्या वैशिष्ट्याला एकदम उठाव मिळतो. तसेच प्रसंगाच्या अनुरोधाने कधी साधे गद्य तर कधी अनुष्टुभासारखे साधे छंद, तर कधी शार्दूलविक्रीडितासारखी ऐसपैस रचना, यामुळे संवादाची परिणामकारकता वाढते.

अनुक्रमणिका

रंगभूमीवरील भ्रमर

आधुनिक प्रेक्षकाला या परिणामकारकतेचा फारसा अनुभव नसतो, कारण संस्कृत नाटके मूळ स्वरूपात व मूळ शैलीने केलेली पाहायलाच मिळत नाहीत. संगीताचा घटसर्प झालेल्या मराठी रंगभूमीच्या कंठातून जेव्हा शाकुंतल बाहेर पडते तेव्हा आला श्लोक की काढ सूर या आडमुठ्या धोरणामुळे साऱ्या नाटकाचा चथडा होतो. वस्तुतः पद्य म्हणजे गीत नव्हे. पद्यात अर्थ प्रधान असतो व तो मनावर खोल ठसावा म्हणून तालबद्ध केलेला असतो. नाटकातले श्लोक म्हणजे साधे गद्य नव्हे तसेच गाणेहि नव्हे हे लक्षात ठेवून अर्थपरिपोषक तालामध्ये नटाने म्हटले पाहिजे. गायचे कुठे हे नाटकातच 'गायति' वगैरे सूचना देऊन स्पष्ट केलेले आहे. पण आज आम्ही शाकुंतलात स्वतःचे श्लोक घालून प्रयोग करायला जिथे कचरत नाही तिथे मूळ रंगसूचनांना कोण विचारतो ?

नाटकाचा प्राण जे संवाद व शब्द त्यांच्या बाबतीत संस्कृत नाटकाचे वैचित्र्य अतुल आहे. तसेच नाटकाचे दुसरे प्रधान अंग जे नृत्य त्यांच्याहि बाबतीत आहे. किंबहुना नाट्य या शब्दातच नृत्यकला अभिप्रेत आहे. नटाच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या शब्दाप्रमाणेच त्याच्या अंगप्रत्यंगाच्या हालचाली महत्त्वाच्या असतात. कालिदासाच्या नाटकात असे अनेक प्रसंग आहेत की नृत्यप्रवीण नटाला एक शब्दहि तोंडातून न काढता नुसत्या अंगविक्षेपांनी प्रेक्षकांना तल्लीन करून सोडता येईल.

उदाहरणार्थ, शकुंतलेच्या भ्रमरकथेचा प्रसंग घ्या. शकुंतला झाडांना पाणी घालत असता एक भृंगा "माझ्याहून काळाभोर व चंचल दिसणारा तू कोण दुसरा" म्हणून तिच्या डोळ्यावर झेप घालतो, तिथून हाताने वारल्यावर तिच्या कानाशीं गुजगोष्टी करू लागतो. तिला तेहि खपत नाही असें पाहिल्यावर अधिकच लोचटपणा करून तिच्या रतिसर्वस्व अशा अधराला झोंबू लागतो.* एखाद्या नृत्यकुशल नटीने हा प्रसंग वठवला तर तिला आपली सर्व कला या एका प्रसंगांत कसला लावता येईल. तोंडातून एक अक्षरही न काढता नाट्य किती परिणामकारक होऊ शकते याचे प्रत्यन्तर या प्रसंगाने मिळू शकेल.

---

* चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं ।
रहस्याख्यायीव स्वनसि मृदुकर्णान्तिकचरः ।
करौ व्याधुन्वन्त्याः पिबसि रतिसर्वस्वमधरम् ।
वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती ॥

को भेदः पिककाकयोः !

वास्तवतेबद्दल ज्यांच्या कल्पना अगदीच असंकृत व ओबडधोबड आहेत असे वाचक "हा कसला नाटककार, कुठे रंगभूमीवर भ्रमर आणतो, तर कुठे रथांत बसून राजा शिकार करतो आहे अशी कल्पना करतो, तर कुठे आपल्या नायकाला नक्षत्रे, ढग वगैरे मार्गाने प्रवास करायला लावतो. हे सर्व रंगभूमीवर कसे दाखवायचे ?" असा प्रश्न करतात.

असा प्रश्न करणाऱ्या वाचकांच्या कलेइतकी कालिदासकालीन नाट्यकला अप्रगत नव्हती. शिकार दाखवायची म्हणजे रंगभूमीवर रथ व घोडे आणले पाहिजेत व भ्रमरबाधा दाखवायची म्हणजे एखादा भुंगाच पकडून रंगभूमीवर सोडला पाहिजे अशी त्या वेळी समजूत नव्हती. हे प्रसंग नृत्य व वाद्यांच्या साह्याने वठवता येतात व या रीतीने वठवल्यास रंगभूमीवर खरे भुंगे व घोडे आणण्यापेक्षां ते शतपटांने अधिक परिणामकारक होतात. भुंगे व घोडेच काय पण रंगभूमीवर खरी फुले देखील दाखवयाची प्राचीन नाट्यमहर्षींना जरूर वाटत नव्हती. पात्र रंगभूमीवर फुले वेचते म्हणजे खरी फुले उचलून परडीत टाकत नाही तर "पुष्पोच्चयं नाटयति," फुले वेचण्याची क्रिया हावभावाने व्यक्तविते. रंगभूमी-वर खरी फुले वेचण्याची क्रिया जास्त रोचक वाटेल की फुले वेचण्याचे नृत्यात्मक हावभाव जास्त रोचक वाटतील हे रसिकांना काय सांगायला पाहिजे ?

शब्द न वापरता नुसत्या अंगविक्षेपांनी वठवून दाखवता येण्यासारखे किती प्रसंग शेक्सपीअरच्या नाटकांतून काढून दाखवता येतील ? माझ्या पाहण्यांत व वाचण्यांत शेक्सपीअरचे जे नाट्य आले आहे ते मुख्यत: शब्दमय म्हणजे एकाच तऱ्हेचे आहे. उलट कालिदासाच्या कोणत्याहि एकाच नाटकातले नाट्य देखील एकाच तऱ्हेचे नाही. विविधतेच्या कपोलकल्पित अभावाबद्दल कालिदासाला नाके मुरडणाऱ्या टीकाकारांना शेक्सपीअरच्या नाट्यप्रकाराचा हा ठरीवपणा दिसू नये हे त्यांच्या डोळसपणाचे लक्षण खास नाही.

कालिदासाच्या तिन्ही नाटकात एक राजा हा नायक, एक सर्वांगसुन्दर युवति ही नायिका व तिच्याशी राजाचे लग्न होणे ही फलनिष्पत्ति, हीच वस्तु असल्यामुळे ही नाटके एका साच्याची आहेत असे टीकाकार म्हणत आले आहेत. कालिदासाच्या सरस्वतीचे साक्षात् दर्शन ज्यांना घडले नाही त्यांना हे म्हणणे बरेच सयुक्तिक वाटते. पण मूळ नाटकाशी घनिष्ट परिचय झाल्यावर तिन्ही नाटकातले हे साम्य दिखाऊ आहे, त्यातले भेद मात्र मूलगामी आहेत, हे कळायला वेळ लागत नाही. रामायण व इलियड या दोन्ही महाकाव्यांमध्ये स्त्रीहरणामुळे ालेले युद्ध हाच विषय आहे म्हणून दोन्ही काव्ये एकाच साच्याची आहेत असे

म्हणणे कितपत बरोबर होईल ? किंवा महाभारतातील शकुंतलोपाख्यान व शाकुंतल नाटक यांचे कथानक सारखे असल्यामुळे या दोन्ही कृति सारख्याच आहेत हे विधान कितपत समर्थनीय ठरेल ?

इलियड व रामायण, शकुंतलोपाख्यान व शाकुंतल यांच्यात जेवढे साम्य आहे तेवढेच कालिदासाच्या तीन नाटकात आहे. मालविकाग्निमित्रात विदूषकाच्या साह्याने राजाने अन्तःपुरात केलेली कारस्थाने हा मुख्य विषय आहे. सर्व घटनांचे स्वरूप लुटुपुटीचे व गमतीचे आहे. आणीबाणीचे प्रसंग व सखोल भावनांचे उद्रेक दाखविण्याचा त्यात उद्देश नाही. विक्रमोर्वशीयामध्ये विरहवेदनेचे विस्तृत प्रणयन आहे. त्यात संभाषणापेक्षा भाषणाचे महत्त्व अधिक आहे व त्याचा एकंदर परिणाम गीतनाट्यासारखा होतो. शाकुंतलामध्ये एका दृष्टीने जीवनाचे सर्वांगीण दर्शन आहे, सखोल भावना आहेत तसा नर्म विनोदहि आहे, आणीबाणीचे प्रसंग आहेत तसेच गमतीचेहि प्रसंग आहेत. ही नाटके रंगभूमीवर कालिदासीय पद्धतीने करून दाखविण्यात आली तर ती एकाच साच्याची आहेत हा भ्रह दूर होण्यास वेळ लागणार नाही.

सीता आणि द्रौपदी

कलादृष्ट्या कालिदासात दोष काढणे गुलाबाच्या सौन्दर्यात दोष दाखविण्याइतकेच दुर्घट आहे, असे पाहून काही टीकाकार कालिदासकृतीवर समाजशास्त्रीय व नैतिक आक्षेप घेऊ लागतात. अनेक राण्या असताना आणखी एक स्त्री अन्तःपुरात आणण्यासाठी राजाने झुरावे हे या आक्षेपकांना कसेसेच वाटते.

अशा तऱ्हेच्या आक्षेपकांना कोणत्याहि कलाकृतीच्या चिंधड्या उडवता यतील. ज्या समाजात एका स्त्रीने एकाच वेळी अनेक पुरुषांशी लग्न करण्याची चाल आहे त्या समाजातील लोकांनी आपल्या चालीप्रमाणे ऑथेल्लो नाटकाचे मूल्यन करायचे ठरवले, तर त्यांना ते सर्वच नाटक वेडगळ ठरवता येईल. बायकोने आपला रुमाल परपुरुषाला दिला म्हणून तिचा गळा दाबून प्राण घेणारा ऑथेल्लो हास्यास्पद व अशी दृश्ये दाखवणारा नाटककार निर्बुद्ध आहे, असेहि या समाजातले टीकाकार म्हणू शकतील.

वस्तुतः स्त्रीपुरुषसंबंधविषयक रूढि व कलाकृतीचे मूल्यमापन या गोष्टी स्वतंत्र आहेत व खऱ्या रसिकाला त्यांची गल्लत होऊ न देणे सहज साधते. याबद्दल एक उदाहरण येथे नमूद करण्यासारखे आहे.

काही वर्षांपूर्वी दिल्लीमध्ये एका इंग्रजी कंपनीचे ऑथेल्लोचे प्रयोग सुरू होते व त्याच वेळी जवळच्याच एका रंगमंदिरात 'The Little Hut'

अनुक्रमणिका

या आंद्रे रूसीच्या नाटकाचे काही प्रयोग झाले. ' Little Hut ' चे कथानक ऑथेल्लोच्या अगदी विरुद्ध आहे. त्यात एक जोडपे व त्यांचा एक मित्र समुद्री दुर्घटनेत सापडून एका निर्जन बेटावर फेकले जातात. " निर्जन बेटावरची नीति व शहरी नीति एक असू शकत नाही. तुमच्याप्रमाणेच मलाहि विवाहजीवन पाहिजे तेव्हा दोन पुरुष व एक स्त्री असे तिघांचे आपण कुटुम्ब बनवू " असे त्या जोडप्याचा मित्र सुचवतो व ही सूचना अमलात आणली जाते. या व्यवस्थेच्या अनुरोधाने हास्यरसाचे फवारे उडवले आहेत.

' ऑथेल्लो ' व ' The Little Hut ' या दोन्ही नाटकांचे दिल्लीतील प्रेक्षक साधारणपणे एकाच समाजात व एकाच संस्कृतीत वाढलेले होते. असे असून देखील परपुरुषस्पर्शाच्या नुसत्या संशयांवरून बायकोचा गळा घोटणाऱ्या ऑथेल्लोशी ते जसे समरस होत तसेच मित्राची तऱ्हेवाईक सूचना मान्य करणाऱ्या ' The Little Hut ' मधील नवऱ्याशी देखील समरस होत. निरपराध देस्दिमोनाचा अन्त पाहून ते जसे हळहळत तसेच दोन पुरुषांशी संसार करणाऱ्या The Little Hut मधील स्त्रीचे चातुर्य पाहून हशाहि पिकवीत. प्रभावी नाटयाचा आस्वाद घेताना रसिक स्त्रीपुरुषविषयक रूढ नीतिकल्पना कशा बाजूला ठेवू शकतो याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

अपनाटय

तुलना अरोचक असतात (Comparisons are odious) **या तत्त्वाप्रमाणे थोर ग्रंथकारांची तुलना करून एकाला श्रेष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ ठरवणे यात मला स्वारस्य नाही.** पण असा उद्योग कुणी आरंभलाच तर त्याला त्याच्याच पद्धतीने उत्तर देता येते हे आतापर्यंत दाखवले.

हाच प्रकार पुढे चालवून शेक्सपीअरमध्ये आणखीहि अनेक दोष काढून दाखविता येतील. यांपैकी कुणाच्याहि सहज लक्षात येण्यासारखा दोष म्हणजे शेक्सपीअरमधील अपनाटय किंवा मेलोड्रामा. एका दोषाने साऱ्या गुणांची माती होणे हा जसा शेक्सपीअरच्या करुण नायकांचा साचा आहे त्याचप्रमाणे कसे तरी करून नाटकातल्या सर्व प्रमुख पात्रांना मारून टाकल्याशिवाय करुणरस रंगू शकत नाही अशी शेक्सपीअरची आडमुठी समजूत आहे. परिणाम साधण्यासाठी आत्महत्या, खून वगैरे सवंग उपायांचा शेक्सपीअरने भरमसाट उपयोग केला आहे. कालिदासाची व एकन्दरीतच संस्कृत नाटककारांची नाटयाविषयीची कल्पना यापेक्षा कितीतरी अधिक सखोल व परिष्कृत आहे. रंगभूमीवर युद्ध, मरण वगैरे सारखे प्रसंग दाखवू नयेत या त्यांच्या दण्डकाच्या मुळाशी मरणापेक्षा अधिक करुण व युद्धापेक्षा अधिक दारुण असे कितीतरी प्रसंग मानवी भावजीवनात

अनुक्रमणिका

असतात याची जाणीव आहे. प्राणान्तिक प्रेम दाखवून आपल्याशी गान्धर्व विवाह करणाऱ्या राजाला आपले नाव देखील आठवत नाही व ज्यांच्या प्रेमछायेखाली आपण वाढलों ते आप्तेष्टहि आपल्याला पाठमोरे झाले आहेत, अशा प्रसंगी शकुन्तलेला वेड लागते असें दाखवून कारुण्याचा थयथयाट निर्माण करायचा शेक्सपीअरला मोह झाला असता. पण कालिदासाची शकुन्तला "तुम्हीहि मला पारखे झालात !" "यूयमपि मां परित्यजथ !" या एकाच आर्त उद्‌गाराने प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेते. नाटककाराची प्रतिभा भव्य असेल तर आपल्या चित्रणाने प्रेक्षकांचे हृदयविदारण करायला त्याला कोणत्याहि भडक रंगाची आवश्यकता वाटत नाही, हें कालिदासीय नाट्यातून अशाप्रकारे अनेक वेळा प्रत्ययास येते.

भवति रसनामात्रविषयः।

आतापर्यंत मांडलेले मुद्दे महत्त्वाचे असले तरी कोणत्याहि साहित्याचे महत्त्व अशा टीकांनी पारखले जाऊ शकत नाही. श्रेष्ठत्वाची एकच निर्णायक कसोटी आहे. शेक्सपीअरच्या मानाने कालिदासाला कमी लेखणाऱ्या टीकाकारांना मी एकच प्रश्न विचारू इच्छितो. "उत्तम दर्जाच्या नटांनी उत्तम रीतीने वठवलेली या दोन्ही नाटककारांची नाटके तुम्ही पाहिली असतील तर तुम्हाला कुणाची नाटके अधिक पहावीशी वाटतील ? कुणाचे शब्द तुमच्या कानात अधिक काळ घुमत राहतील ? कुणाचे नाट्यप्रसंग तुमच्या अन्तश्चक्षूंना अधिक सातत्याने दिसत राहतील ?"

"शेक्सपीअरचे" असे उत्तर जर ते प्रामाणिकपणे देऊ शकत असतील तर आतापर्यंत मांडलेले सर्व मुद्दे खरे असले तरी शेक्सपीअर अधिक श्रेष्ठ आहे असे त्यांनी मानणे समर्थनीय ठरेल.

माझ्या दृष्टीने मात्र या प्रश्नाचे निःसंदिग्ध उत्तर "कालिदासाचे" असेच आहे. सर्व तऱ्हेच्या सोयी उपलब्ध असलेल्या जगद्विख्यात नटांनी केलेली शेक्स-पीअरची नाटके मी पाहिली आहेत. कालिदासाच्या नाटकाचे प्रयोग मात्र नवशिक्या नटांनी, लेखकाला अभिप्रेत असलेली पद्धत न सांभाळता केलेले असेच पाहिले आहेत. असे असूनहि माझ्या मनात कालिदासाचे नाट्यप्रसंग व कालि-दासाच्या नायकनायिका सतत घोळत असतात. शेक्सपीअरला त्या मानाने दुय्यम स्थान आहे. शेक्सपीअरचे नाव जमेस धरूनहि कालिदासाच्या बाबतीत मी "अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव" असे निःशंकपणे म्हणायला तयार आहे.

卐

महाभारतातील एका साध्या श्लोकाचा अर्थ

लेखक—म. म. डॉ. वा. वि. मिराशी

पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर यांनी युगवाणीच्या गेल्या अंकात (जानेवारी १९६० च्या अंकात) 'राज्ये चैवाभिषिच्यस्व भारताननुशाधि च। दारांश्च कुरु धर्मेण मा निमज्जीः पितामहान् ॥' या महाभारतांतील सत्यवतीच्या वचनाचा अभिनव अर्थ लावला आहे. 'दाराः' याचा अर्थ 'पत्नी' असा असल्यामुळे 'धर्मेण दारान् कुरु' याचा अर्थ 'धर्माने विवाह कर' असा नसून 'धर्माने (गृहस्थाश्रमी धर्माने) आपल्या पत्नीशी वाग' असा आहे असें त्यांचे म्हणणे आहे. भीष्म विवाहित होते किंवा अविवाहित होते' ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यास हा श्लोक अत्यंत महत्वाचा आहे. 'दारान् कुरु' याचा अर्थ 'विवाह कर' असा झाल्यास भीष्माने त्यापूर्वी विवाह केला हे सिद्ध करण्यास दुसऱ्या प्रमाणाची जरूरी राहणार नाही. या श्लोकाचे दुसरे महत्त्व हे की हा श्लोक महाभारताच्या सर्व प्रतात–उत्तर व दक्षिण भारतीय, चिकित्सक तशाच साध्या आवृत्तीत—आढळतो. तेव्हा त्याचा विचार केल्याशिवाय सुटका नाही. म्हणून त्याचा सरळ अर्थ काय हे पाहू. संस्कृत भाषेचे ज्याला सामान्य ज्ञान आहे तो 'दारान् कुरु' याचा अर्थ विवाह कर असाच करील. आणि याच अर्थात त्याचा प्रयोग संस्कृत भाषेत व वाङ्मयात होतो हे सहज दाखविता येईल. ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे की त्याकरिता उदाहरणे देण्याची जरूरी नसावी. पण जरूरी असल्यास खालील उदाहरणे पाहा—

'दारान कुरु' याचा अर्थ

मनुस्मृति अध्याय ३, श्लोक ५—

असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥

या मध्ये दारकर्माकरिता व संभोगाकरिता कोणती कन्या योग्य होय हे सांगितले आहे. येथे 'दारकर्म' याचा अर्थ 'विवाह' असाच घेतला पाहिजे. 'दारकर्म' यामध्ये 'दारान् कुरु' यातील शब्दच योजिले आहेत.

रघवंश, सर्ग ५, श्लोक ४०—

तं श्लाध्यसम्बन्धमसौ विचिन्त्य दारक्रियायोग्यदशं च पुत्रम् ।
प्रस्थापयामास ससैन्यमेनमृद्धां विदर्भाधिपराजधानीम् ।।

यामध्येहि 'दारक्रिया' याचा अर्थ विवाह असाच घेतला पाहिजे. या शब्दातहि 'दार' आणि 'कृ' यांचाच उपयोग केला आहे.

तेव्हा 'दारांश्च कुरु धर्मेण' याचा अर्थ 'धर्माने विवाह कर' असाच कोणीहि निराग्रही मनुष्य करील.

भावी अर्थाचा शब्दप्रयोग

'दाराः' याचा अर्थ 'विवाहित स्त्री' असा असल्याने 'धर्मेण दारान् कुरु' याचा सरळ अर्थ 'धार्मिक विधीने पत्नी कर' असा कसा करता येईल असे पं. कुरुंदकर विचारतात. त्यांना भाषेत कित्येकदा भावी अर्थाने शब्दाचा प्रयोग होतो हे माहीत नसावे. तसे नसते तर मनुस्मृतीतील (३, ४) 'उद्वहेत द्विजो भार्याम्' याचा अर्थ 'द्विजाने दुसऱ्याच्या पत्नीशी विवाह करावा' असा करावा लागला असता !

तेव्हा सत्यवतीच्या वचनातील 'दारांश्च कुरु धर्मेण' याचा अर्थ 'धर्माने विवाह कर' असाच आहे. या सांऱ्या वाक्याचा 'आपल्या विवाहित स्त्रीशी धर्माने वाग' असा विलक्षण अर्थ करणारेच 'संस्कृत भाषेची व विद्येची विटंबना करण्यास प्रवृत्त झाले आहेत' हे वाचकांच्या ध्यानात येईल.

वादाचा संपादकीय समारोप

'भीष्म विवाहित की अविवाहित ?' या वादाला पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर यांच्या युगवाणीच्या दिवाळी अंकातील लेखावरून सुरवात झाली. डिसेंबरच्या अंकात म. म. डॉ. मिराशी यांनी पं. सीतारामशास्त्री यांच्या लेखाला उत्तर दिले आणि शास्त्रीबुवांनी डॉ. मिराशींच्या लेखाला जानेवारीच्या अंकात प्रत्युत्तर दिले. येथेच हा वाद समाप्त व्हावयास पाहिजे होता. पण डॉ. मिराशींच्या आग्रहावरून त्यांचा वर दिलेला लहानसा लेख प्रकाशित करणे आम्हास भाग पडले. वाद निर्णायक रूपात निकालात निघावा या हेतूने डॉ. मिराशींचा हा लेख प्रकाशित करणे आम्हास इष्टहि वाटले.

डॉ. मिराशींचा हा लेख आम्ही पं. कुरुंदकरशास्त्री यांना दाखविला व त्यांचे त्यावरील म्हणणे समजून घेतले. ते ऐकूनच आम्ही हा समारोप करीत आहोत.

अनुक्रमणिका

वादातील मुद्दे

या वादात जे अनेक मुद्दे उपस्थित झाले त्याबाबत डॉ. मिराशींनी मौनच पाळले आहे. फक्त एकाच मुद्याचा विचार त्यांनी वरील लेखात मांडला आहे. तेव्हा पं. सितारामशास्त्री यांनी विवेचिलेल्या अन्य मुद्याबाबत डॉ. मिराशींना काहीहि म्हणावयाचे नाही, असा निष्कर्ष काढणे भाग आहे.

राहता राहिला '**दारांश्च कुरु धर्मेण**' या श्लोकार्धाचा विचार. या वाक्याचा अर्थ डॉ. मिराशींनी केला आहे तसा, संदर्भ व उपक्रमोपसंहार लक्षात घेता करता येत नाही, असे शास्त्रीबुवांचे म्हणणे आहे. त्यांचे याबाबतचे म्हणणे सारांशरूपाने येणेप्रमाणे आहे.

शास्त्रीबुवांचे म्हणणे

(१) "भीष्मप्रतिज्ञेचा आचार्य कुमारीलभट्टादि पूर्वाचार्यांनी जो शास्त्रशुद्ध अर्थ केला आहे त्याचाच अनुवाद मी केलेला आहे. हा अर्थ चुकीचा आहे, असे डॉ. मिराशींना सिद्ध करता आले नाही. भीष्मप्रतिज्ञेतील श्लोकांचा शास्त्रशुद्ध अर्थ असा की ती प्रतिज्ञा करण्याच्या वेळी भीष्म हे विवाहितच असले पाहिजेत.

(२) "त्याचप्रमाणे भीष्मांनी अश्वमेध यज्ञ केले होते, हे श्रीकृष्णाच्या तोंडचे विधानहि, प्रतिज्ञेच्या श्लोकांप्रमाणे, उभयपक्षी मान्य आहे. या विधानावरूनहि, पूर्वाचार्यांच्या मतानुसार, भीष्म हे विवाहित होते, असेच सिद्ध होते.

(३) "वर दिलेला उपक्रम व उपसंहार ध्यानात घेऊनच मध्यंतरी असलेल्या सत्यवतीच्या वाक्याचा अर्थ लावणे शास्त्रीय दृष्टया क्रमप्राप्त आहे.

(४) "दारा: या शब्दाचा अर्थ 'विवाहित स्त्री' असा आहे, ही गोष्ट डॉ. मिराशींना मान्य करावीच लागली आहे. आता '**दारांश्च कुरु धर्मेण**' या वाक्याचा शास्त्रीय पद्धतीने अर्थ काय होतो, एवढेच पाहावयाचे आहे. शब्दाचा एक वाच्यार्थ असतो व एक लक्षार्थ असतो. वाच्यार्थात शक्तिग्रह असला तरच-शब्दापासून शाब्दबोध होतो. वाच्यार्थात शक्तिग्रह असल्यानंतर जेव्हा वाच्यार्थाने वक्त्याच्या म्हणण्याचे तात्पर्य लागत नाही तेव्हा वाच्यार्थाचा जो संबंधी अर्थ असेल त्याच्यात वाचक शब्दाची लक्षणा होते.

"हा नियम सर्व शास्त्रकारांना मान्य आहे. 'दारा:' या शब्दाचा वाच्यार्थ 'विवाहित स्त्री' असा असल्यामुळे, हा अर्थ जेथे लागत नसेल तेथेच 'विवाह' या अर्थामध्ये 'दार' या शब्दाची लक्षणा करावी लागते. म्हणजे 'विवाह' हा 'दारा:' या शब्दाचा अशा ठिकाणी लक्षार्थ होतो, वाच्यार्थ लागत नाही म्हणून.

डॉ. मिराशींनी 'दारान् कुरु' याचा अर्थ 'विवाह कर' असाच होतो, या आपल्या म्हणण्याला आधारभूत असे जे श्लोक दिले आहेत त्यात 'दारकर्मणि' व 'दारक्रिया' हे जे शब्दप्रयोग आले आहेत त्यांना एक पार्श्वभूमि आहे. मनुस्मृतीतील जो श्लोक डॉ. मिराशींनी दिला आहे त्याच्या अलिकडच्या श्लोकातील उत्तरार्धात 'उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम्' असे स्पष्ट विधान आहे आणि यानंतर पुढील श्लोकात 'दारकर्मणि मैथुने' असे शब्दप्रयोग आलेले आहेत. दारकर्मातील जे मैथुन ते धर्मविहित पद्धतीने करता यावे यासाठी कोणती कन्या या कर्माला योग्य होईल, हे या दोन श्लोकात सांगितले आहे. येथे 'दारकर्मणि' याचा 'विवाह' असा अर्थ संदर्भाने व लक्षणेनेच घ्यावा लागतो.

"त्याचप्रमाणे रघुवंशातील श्लोकालाहि अशीच पार्श्वभूमि आहे. विवाहाला योग्य दशा प्राप्त झाली आहे आणि संकल्पित संबंध श्लाघ्य आहे; अशी परिस्थिति आहे म्हणून 'दारक्रिया' याचा लक्षार्थ 'विवाह' असा येथे करावा लागतो.

सारांश, डॉ. मिराशींनी जे श्लोक आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ दिले आहेत त्यात 'दारकर्मणि' व 'दारक्रिया' या शब्दप्रयोगांचा लक्षार्थ विवाह असा होतो, वाच्यार्थ नव्हे. लक्षार्थबोधक शब्द हा वाच्यार्थाविषयी प्रमाण नसतो, असा सर्वमान्य नियम आहे. म्हणून 'दारांश्च कुरु धर्मेण' या सत्यवतीच्या वाक्याचा अर्थ लावताना प्रथम वाच्यार्थानुसारच तो लावला पाहिजे, वाच्यार्थ लागतच नसेल तरच लक्षार्थ विचारात घेता येईल. उपक्रमोपसंहार, पूर्वाचार्यांचे मत आणि शब्दाचे वाच्यार्था–लक्षार्थाबाबतचे शास्त्रीय नियम, हे सर्व 'दारांश्च कुरु धर्मेण' या वाक्याचा आम्ही जो अर्थ केला आहे, त्याचेच समर्थन करतात.

म्हणून डॉ. मिराशींचा हा शेवटचा व एकुलता एक आधारहि कोलमडून पडतो."

वादाचा निष्कर्ष

पं. सीताराम शास्त्र्यांचे हे म्हणणे बिनतोड दिसते. आणि म्हणून भीष्म विवाहित होते, असाच निष्कर्ष महाभारतातील उभयपक्षी मान्य अशा श्लोकांवरून व पूर्वाचार्यप्रणीत शास्त्रशुद्ध युक्तिवादावरून काढावा लागतो. डॉ. मिराशींना हा युक्तिवाद खोडता आलेला नाही.

एक दुर्लक्षित मुद्दा

या वादात उभयपक्षांनी एका महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले आहे, असा आक्षेप श्री. हरिहरराव देशपांडे यांनी आमच्याकडे पाठविलेल्या एका लेखात

केला आहे. 'भीष्म विवाहित की अविवाहित' हा वाद फार पुरातन आहे. कलकत्ता विद्यापीठाचे संस्कृतचे आचार्य पं. अनंत कृष्णशास्त्री यांच्या 'मीमांसा-शास्त्रसार' नामक ग्रंथात या वादाचा उल्लेख आहे. यावरून हा वाद तेरा-चौदाशे वर्षांपूर्वीच होऊन गेलेला आहे आणि नागेशभट्टाचार्य व कुमारिल भट्ट यांच्यासारख्या दिग्गज पंडितांनी त्यात भाग घेतलेला आहे, असे स्पष्ट दिसून येते. "नागेशभट्टाचार्यांनी 'लघुमंजुषे'मध्ये या वादाचा परामर्ष घेताना भीष्मांनी यागानुष्ठान केले होते, ही गोष्ट मान्य केली असली तरी ब्रह्मचारी, म्हणजे अविवाहित, भीष्मांनी यागानुष्ठान करणे ही गोष्ट अपवादभूत मानली आहे. आणि अग्नीला ज्याप्रमाणे भक्ष्याभक्ष्याचा दोष लागत नाही त्याप्रमाणे तेजस्वी पुरुषाच्या आचाराच्या बाबतीत धर्म्य काय व अधर्म्य काय, हा विवेक लागू करणे योग्य नव्हे. या न्यायानेच भीष्माच्या यागानुष्ठानाचे नागेशभट्टाचार्यांनी समर्थन केले आहे."

नागेशभट्टाचार्यांचा युक्तिवाद दैवी भूमिकेवरून करण्यात आलेला दिसतो. तो ज्यांना पटेल त्यांनी भीष्म अविवाहित होते, असे खुशाल मानावे. पण हे करीत असता व्यावहारिक भूमिकेवरून वाक्यार्थ लावणे अशक्य होते तेव्हाच दैवी भूमिकेचा अवलंब करणे समर्थनीय ठरू शकते, हा शास्त्रीय नियम लक्षात ठेवणेहि आवश्यक आहे. व्यावहारिक व पार्थिव भूमिकेवरून विचार करता आचार्य कुमारिलभट्टादि पूर्वाचार्यांनी काढलेला व पं. सीतारामशास्त्री यांनी शास्त्रीय परंपरेस अनुसरून पुरस्कारिलेला निष्कर्षच निर्णायक मानावा लागतो. या निष्कर्षाला बाधा पोचवू शकेल असा कोणताहि समर्थ युक्तिवाद अद्यापहि पुढे आलेला नाही. डॉ. मिराशींनाहि हे साध्य झालेले नाही.

हा वाद आता या समारोपाने संपुष्टात आणला जात आहे. या वादात भाग घेतल्याबद्दल पं. सीतारामशास्त्री व डॉ. मिराशी यांचे आम्ही फार आभारी आहोत. त्याचप्रमाणे श्री. हरिहरराव देशपांडे यांचेहि आम्ही फार आभारी आहोत.

—संपादक

अनुक्रमणिका

वार्ड नं. २३, बेड नं. २७

ना. रा. शेंडे

(मागील अंकावरून पुढे चालू)

वार्ड नं. २३, बेड नं. २७ ला आता एक आगळेंच स्वरूप प्राप्त झालं ! त्या जागेला नवीनच उठाव आला. ते आकर्षणाचं, लक्ष वेधून घेणारं एक स्थळ झालं. जवळपास रोजच सकाळी किंवा सायंकाळी कुण्या न् कुण्या कार्यकर्त्यांच्या, साहित्यिकांच्या बैठकी होत. विविध विषयावर चर्चा होई. नारायणची त्या वेळी एकनिष्ठ श्रोत्याची भूमिका राही. त्याला वाटलंच तर चर्चेच्या शेवटी तो अगदी मोजक्या शब्दात आपलं मत प्रदर्शित करी. त्याचं मन प्रसन्न राखण्याचा प्रत्येक व्यक्ति प्रयत्न करी.

नारायणला त्या इस्पितळात काही कमी नव्हतं. जो त्याला भेटायला येई तो त्याचेसाठी काही ना काही भेट देऊन जाई. फळं, बिस्किटाचे पुडे, नाना प्रकारचे खाद्यपदार्थ यांनी त्याचं कपाट खचून भरलेलंच असायचं. त्याचा सर्वांना प्रसाद मिळायचा. सायंकाळी बाळगोपाळांचा मेळावा जमे. नारायण त्या बाल-बालिकांचं खाऊ देऊन स्वागत करी. बेड नं. २७ ची ती साइड रूम कशी गज-बजलेली असायची !

वार्ड नं. २३ च्या डॉक्टरांचा, सिस्टर्सचा नि नर्सेसचा नारायणवर मोठा लोभ. ड्युटीवर यायचं तेव्हा प्रथम नारायणला सलामी दिली जायची आणि मग सबंध मेडिकल कॉलेज-हॉस्पिटलमधील अनेक डॉक्टरांना, सिस्टर्सना नि नर्सेसना बेड नं. २७ च्या अस्मितेनं अंकित केलं ! अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनींचा नारायणच्या दर्शनासाठी, त्याचे दोन शब्द ऐकण्यासाठी आणि आशीर्वादासाठी रीघ लागायची. नारायणची योग्यता ती काय, पण त्याचे अवती-भवती फार मोठ्या गोतवळचाची असीम निष्ठा उभी राहिली.

एके सकाळी शुभ्र वस्त्र परिधान केलेली सावळचा वर्णाची, सडपातळ बांध्याची एक तरुणी नारायणला भेटायला आली. मोठी बोलकी अन् हसरी मूर्ति. गीता तिचं नांव. तिनं नारायणला प्रणाम केला.

" या गीतादेवी या. " त्यानं तिचं स्वागत करून म्हटलं.

" मला वाटलं, आमची गीता हरवली. "

गीता खदखदा हसली आणि म्हणाली,

" उपनिषदे आणि महाभारत–रामायणादि जाडचा ग्रंथांच्या ढिगाऱ्यात ाता दडलां होती, हा काय तिचा दोष आहे ?"

" वा गीता वा " त्यानं तिला शाबासकी दिली.

गीता थोडा वेळ स्तब्ध बसली. कसला तरी विचार करून ती म्हणाली,

" आपलं हे तपकिरी रंगाचं स्वेटर तितकसं चांगलं नाही दिसत. "

" अशा बाबीचा मी कधी विचार करीत नाही. "

" पण मला बरं दिसत नाही ना. " हातवारे करीत गीता म्हणाली,

" माझी एक विनंती ऐकता का ? "

" काय ?"

" हे पांढरं स्वेटर वापरा " तिनं लहानशा पिशवीतून पांढऱ्या उंची करीचं सुन्दर वीण असलेलं स्वेटर काढून ते त्याला नजर केलं.

" आहे. सुबक आहे. पण..."

" मी काही ऐकत नाही. आता घाला हे स्वेटर, माझ्या समक्ष. "

" ही आज्ञा आहे काय ? "

" नाही. विनंती आहे. "

नारायणनं नवीन स्वेटर घातलं. हसतमुखानं गीता निघून गेली.

दुपारी श्रीमती सगुणाबाई आल्या. आईची ममता त्यांनी व्यक्त केली व रायणला पौष्टिक फराळाचा डबा भेट दिला.

आणि मग सायंकाळी फुलपाखरूपंखी सुबक वस्त्र परिधान केलेली सुडौल ऱ्याची गौरवर्णी तरुणी काहीशा संकोचानंच बेड नं. २७ जवळ आली. तिनं केला प्रणाम स्वीकारून नारायणनं खुणेनंच विचारलं,

" कोण तू ?"

" सौदामिनी " आपल्या काजळी नेत्राच्या पापण्या झटकत तिनं आपलं व सांगितलं.

" सौदामिनी देवी. " नारायण घुटघुटला. सौदामिनी थोडी चपापली.

" चपापू नका. देवी म्हणण्याची मला खोड आहे " त्यानं खुलासा केला. यंत हळू बोलण्याची व आपल्या चेहऱ्यावरील विविध रंगी भावांनी आपले ागत व्यक्त करण्याची तिची शैली त्याला फार आवडली.

सौदामिनीनंतर तिची साधा सरळ पेहराव केलेली बहीण प्रमिला आली. तिची काहीशी भोळसट प्रकृति आणि काही विशिष्ट शब्दावर भर देऊन पुढील वाक्य भरकन् उच्चारण्याची प्रवृत्ति त्याला मोठी गमतीची वाटली. तिच्या मागोमाग गोरी उषा नि सावळी प्रभा आली. आपल्या खेळकर स्वच्छंदी वृत्तीनं त्यांनी नारायणच्या आनंदात भर घातली न घातली तो मीरा नि राज या थोडचा अल्लड अन् काहीशा भांडखोर तरुणींनी धाव घेऊन त्याची मनमुराद करमणूक केली. तरुणींच्या अन् बालबालिकांच्या घोळक्यात त्याचा वेळ कसा निघून जाई हे कळत नसे. बेड नं. २७ ची साइड रूम म्हणजे नारायणचा थाटलेला छोटासा उत्साहवर्धक संसार. त्यात आनंदाचे निर्मळ झरे झुळझुळत असलेले! उभ्या आयुष्यात नारायणला जे स्वर्गसुख लाभलं नाही ते मेडिकल कॉलेज-हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालं.

एके दिवशी दिलदार डॉ. द. स. हजरनवीस यांनी मोठचा आपुलकीने नारायणला हॉस्पिटलमधील औद्योगिक उपचार केन्द्रात नेऊन माहिती दिली. लुळचा पांगळचा नि नानाविध व्याधीनं शरीर जर्जर झालेल्या रोग्यांना विरंगुळा वाटावा व त्यांचे रोग अंशतः तरी दूर व्हावेत, त्याबरोबर त्यांना विविध कलांत्नंहि शिक्षण प्राप्त व्हावं म्हणून त्या उपचार केन्द्राच्या एक प्रमुख सेवि[illegible] कु. निर्मलाताई हसतमुखानं रोग्याची घेत असलेली काळजी-तिचा मनमिळा[illegible] स्वभाव व कार्यतत्परता या गुणांचा त्याचेवर परिणाम झाला. तो उपचार केन्द्रात रममाण झाला. निर्मलाताई वार्ड नं. २३ मध्ये यायची. नारायणाची भेट घेऊन त्याच्या आजाराबद्दल अगत्यानं चौकशी करायची अन् त्याला चित्रकलेबद्दल माहितीहि द्यायची. नारायणच्या छोटचाशा साहित्यक्षेत्रात आता कलेची बारीकशी वाट निर्माण झाली.

आज नारायणला डॉक्टरांनी पुन्हा नीट तपासलं. चारपांच किमती औषधं लिहून दिली. चाळीस पन्नास रुपयांची ती औषधं. एवढी रक्कम कुठून आणायची? त्यानं खिसे चाचपले. अवघे सहा आणे निघाले. काय होणार या सहा आण्यांनी? त्यानं एक उसासा टाकला नि रवीन्द्रनाथ टागोराचें चित्र तारेनं गुंफण्यात तो गढून गेला. आपल्याला पैशाची नितांत गरज असल्याचं भान तो काही वेळ विसरला. इतक्यात एका व्यक्तीनं त्याच्या खोलींत प्रवेश केला. भगवी लुंगी, भगवा पायघोळ अंगरखा नि भगवाच फेटा परिधान केलेल्या त्या व्यक्तीकडे नारायणनं आश्चर्यानं पाहिलं. "या महात्माजी या," त्यानं त्या व्यक्तीचं स्वागत केलं.

"कसं येणं केलं महात्माजी?"

" आपल्या दर्शनाला." महात्मा हसत उत्तरला.

" माझं दर्शन ? "

" होय. आपल्या दर्शनाची तीव्र इच्छा झाली."

" काय आज्ञा आहे महात्माजी ? "

" आपण आज्ञा करावी. त्यासाठी तर आलो " दिल्लीचे महात्मा अभयराज गंभीरपणे म्हणाले.

" महात्माजी, आपण दर्शन दिलं, सर्व कांही पावलं मला." नारायण तितक्याच गंभीरतेनं उद्गारला.

" आपण लवकर रोगमुक्त व्हाल. प्रभूपाशी आमची प्रार्थना आहे," महात्मा अभयराज उभे होत म्हणाले अन् अंगरख्याच्या खिशात हात घालून त्यांनी काही रक्कम त्याच्या स्वाधीन करीत सद्गदित होऊन म्हटलं,

" या अल्पशा सेवेचा स्वीकार करा. "

नारायणनं क्षणभर त्या रकमेवर नजर रोखली नि ती मस्तकाला लावून महात्माजींना साभार परत करीत म्हटलं,

" महात्माजी, आपल्या जिव्हाळ्याची भेट कदापि विसरणार नाही. पण भेट परत करीत आहे, याची खंत वाटू देऊ नका."

" छे छे. दिलेली भेट परत घेणार नाही. असू द्या ती. यापेक्षा विशेष काही मला करायला हवं. परंतु..." महात्माजींचा कंठ भरून आला.

" महात्माजी, आज आपण मला प्रत्यक्ष देवदूतच म्हणून दर्शन देत आहात. आपल्या सदिच्छेचा अवमान मी कसा करणार ? तरी माझी प्रतिविनंती आपण ऐकून मजवर अनुग्रह करावा."

महात्मा अभयराज तसेच उभे होते. नारायण कळवळून म्हणाला,

" महात्माजी, मी गरीब आहे. अत्यंत गरीब आहे. त्यातून आजारानं खाटेला खिळलो आहे. पण माझ्याहिपेक्षा अत्यंत गरीब, दुःखानं जर्जर झालेले, वेदनांनी विव्हळणारे अनेक रोगी आहेत. आपण जी रक्कम मला देऊ केली तिचा विनियोग त्या दुःखितांना थोडातरी दिलासा वाटण्यासाठी करावा, अशी माझी नम्र विनंती आहे. त्या दुःखितांच्या समाधानात मला खरे समाधान लाभेल ! एवढी कृपा करा महात्माजी."

" जशी आपली इच्छा." महात्माजींनी एक दीर्घ उसासा टाकला; आणि पाठ वळविली. खडावांचा खाट्खाट् आवाज झाला. नारायण महात्माजींच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहातच राहिला.

अनुक्रमणिका

सौदामिनीनंतर तिची साधा सरळ पेहराव केलेली वहीण प्रमिला आली. तिची काहीशी भोळसट प्रकृति आणि काही विशिष्ट शब्दावर भर देऊन पुढील वाक्य भरकन् उच्चारण्याची प्रवृत्ति त्याला मोठी गमतीची वाटली. तिच्या मागोमाग गोरी उषा नि सावळी प्रभा आली. आपल्या खेळकर स्वच्छंदी वृत्तीनं त्यांनी नारायणच्या आनंदात भर घातली न घातली तो मीरा नि राज या थोडचा अल्लड अन् काहीशा भांडखोर तरुणींनी धाव घेऊन त्याची मनमुराद करमणूक केली. तरुणींच्या अन् बालबालिकांच्या घोळक्यात त्याचा वेळ कसा निघून जाई हे कळत नसे. बेड नं. २७ ची साइड रूम म्हणजे नारायणचा थाटलेला छोटासा उत्साहवर्धक संसार. त्यात आनंदाचे निर्मळ झरे झुळझुळत असलेले! उभ्या आयुष्यात नारायणला जे स्वर्गसुख लाभलं नाही ते मेडिकल कॉलेज-हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालं.

एके दिवशी दिलदार डॉ. द. स. हजरनवीस यांनी मोठ्या आपुलकीनं नारायणला हॉस्पिटलमधील औद्योगिक उपचार केन्द्रात नेऊन माहिती दिली. लुळ्या पांगळ्या नि नानाविध व्याधींनं शरीर जर्जर झालेल्या रोग्यांना विरंगुळा वाटावा व त्यांचे रोग अंशतः तरी दूर व्हावेत, त्याबरोबर त्यांना विविध कलांचंहि शिक्षण प्राप्त व्हावं म्हणून त्या उपचार केन्द्राच्या एक प्रमुख सेविका कु. निर्मलाताई हसतमुखानं रोग्याची घेत असलेली काळजी-तिचा मनमिळाऊ स्वभाव व कार्यतत्परता या गुणांचा त्याचेवर परिणाम झाला. तो उपचार केन्द्रात रममाण झाला. निर्मलाताई वार्ड नं. २३ मध्ये यायची. नारायणाची भेट घेऊन त्याच्या आजाराबद्दल अगत्यानं चौकशी करायची अन् त्याला चित्रकलेबद्दल माहितीहि द्यायची. नारायणच्या छोटयाशा साहित्यक्षेत्रात आता कलेची बारीकशी वाट निर्माण झाली.

आज नारायणला डॉक्टरांनी पुन्हा नीट तपासलं. चारपांच किमती औषधं लिहून दिली. चाळीस पन्नास रुपयांची ती औषधं. एवढी रक्कम कुठून आणायची? त्यानं खिसे चाचपले. अवघे सहा आणे निघाले. काय होणार या सहा आण्यांनी? त्यानं एक उसासा टाकला नि रवीन्द्रनाथ टागोराचें चित्र तारेनं गुंफण्यात तो गढून गेला. आपल्याला पैशाची नितांत गरज असल्याचं भान तो काही वेळ विसरला. इतक्यात एका व्यक्तीनं त्याच्या खोलींत प्रवेश केला. भगवी लुंगी, भगवा पायघोळ अंगरखा नि भगवाच फेटा परिधान केलेल्या त्या व्यक्तीकडे नारायणनं आश्चर्यानं पाहिलं. "या महात्माजी या," त्यानं त्या व्यक्तीचं स्वागत केलं.

"कसं येणं केलं महात्माजी?"

"आपल्या दर्शनाला." महात्मा हसत उत्तरला.

"माझं दर्शन ?"

"होय. आपल्या दर्शनाची तीव्र इच्छा झाली."

"काय आज्ञा आहे महात्माजी ?"

"आपण आज्ञा करावी. त्यासाठी तर आलो" दिल्लीचे महात्मा अभयराज गंभीरपणे म्हणाले.

"महात्माजी, आपण दर्शन दिलं, सर्व कांही पावलं मला." नारायण तितक्याच गंभीरतेनं उद्गारला.

"आपण लवकर रोगमुक्त व्हाल. प्रभूपाशी आमची प्रार्थना आहे," महात्मा अभयराज उभे होत म्हणाले अन् अंगरख्याच्या खिशात हात घालून त्यांनी काही रक्कम त्याच्या स्वाधीन करीत सद्गदित होऊन म्हटलं,

"या अल्पशा सेवेचा स्वीकार करा."

नारायणनं क्षणभर त्या रकमेवर नजर रोखली नि ती मस्तकाला लावून महात्माजींना साभार परत करीत म्हटलं,

"महात्माजी, आपल्या जिव्हाळ्याची भेट कदापि विसरणार नाही. पण ही भेट परत करीत आहे, याची खंत वाटू देऊ नका."

"छे छे. दिलेली भेट परत घेणार नाही. असू द्या ती. यापेक्षा विशेष काही मला करायला हवं. परंतु..." महात्माजींचा कंठ भरून आला.

"महात्माजी, आज आपण मला प्रत्यक्ष देवदूतच म्हणून दर्शन देत आहात. आपल्या सदिच्छेचा अवमान मी कसा करणार ? तरी माझी प्रतिविनंती आपण ऐकून मजवर अनुग्रह करावा."

महात्मा अभयराज तसेच उभे होते. नारायण कळवळून म्हणाला,

"महात्माजी, मी गरीब आहे. अत्यंत गरीब आहे. त्यातून आजारानं खाटेला खिळलो आहे. पण माझ्याहिपेक्षा अत्यंत गरीब, दुःखानं जर्जर झालेले, वेदनांनी विव्हळणारे अनेक रोगी आहेत. आपण जी रकम मला देऊ केली तिचा विनियोग त्या दुःखितांना थोडातरी दिलासा वाटण्यासाठी करावा, अशी माझी नम्र विनंती आहे. त्या दुःखितांच्या समाधानात मला खरे समाधान लाभेल ! एवढी कृपा करा महात्माजी."

"जशी आपली इच्छा." महात्माजींनी एक दीर्घ उसासा टाकला; आणि पाठ वळविली. खडावांचा खाट्खाट् आवाज झाला. नारायण महात्माजींच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहातच राहिला.

महात्माजी निघून गेले तरी नारायण किती तरी वेळ शून्याकडे पहात होता. त्याच्या अंतःकरणांत कसल्या तरी विचारांचं काहूर माजलं. त्यातच त्याला किंचितसा डोळा लागला. त्याच्या आजाराच्या चौथ्या दिवशी अगदी रामप्रहरी त्याच्या दर्शनाला आलेली ती अज्ञात सुंदर तरुणी प्रगट झाली. तिनं लीनतेनं हात जोडून विनवलं, "प्रभो, असे चिंतामग्न का ? आपली सूटकेस उघडा. त्यातील डायरीत एक निळा लिफाफा आढळेल. तो लिफाफा तुमची चिंता दूर करील." नंतर ती तरुणी हसली. एक अर्धोन्मीलित गुलाबकळी तिनं त्याला भेट दिली नि ती अदृश्य झाली.

चमकून नारायण जागा झाला. कावऱ्या बावऱ्या नजरेनं त्यानं खोली न्याहाळली. बिछान्यावर कुठं गुलाबकळी आहे का ते पाहिलं. त्याला काहीच आढळलं नाही. नंतर तो सूटकेसजवळ गेला. थरथरल्या हातानं ती उघडली. निळ्या रंगाची डायरी बाहेर काढली, तोच एक सुंदर निळाच लिफाफा त्याच्या दृष्टीस पडला. तो घामाघूम झाला. त्यानं लगबगीनं लिफाफा फोडला तो तेथे शंभर रुपयाची नोट पाहून तो चकितच झाला ! त्यानं लिफाफा उपडा केला तो त्याला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला. स्वप्नात त्या तरुणीनं जी गुलाबकळी भेट दिली होती ती बाहेर पडली अन् तिचा मधुर गंध दरवळू लागला.

ती शंभर रुपयाची नोट खरी का खोटी ? मायावी नोट तर नाही ना? त्याला शंका आली अन् त्याच्या हातातील गुलाबकळीचा विस्तवासारखा त्याला चटका बसला. त्यानं ती खाली टाकली. ती लखलखू लागली. तिच्याकडे पाहणं त्याला असह्य झालं. त्याच्या दुसऱ्या हातात ती नोट होती. त्यानं ती आलटून पालटून पहाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती तरुणी तीत मंद हास्य करीत असल्याचा त्याला भास झाला. नोट अगदी खरी आहे. शंका बाळगू नका, तिचा अवमान करू नका अशी जाणीव ती तरुणी त्याला करून देत असल्याचे वाटले. कुणास ठाऊक, त्याचं मन शांत झालं. हृदयाची धडधड थांबली. हातापायाचं थरथरणं थांबलं. ती गुलाबकळी आता हसत आहे असं त्याला वाटून त्यानं ती चटकन् उचलली. ती हृदयाशी धरली. त्याला मोठी प्रसन्नता वाटली !

त्या शंभर रुपयाच्या नोटेनं नारायणची आर्थिक विवंचना पूर्ण दूर झाली. मेडिकल–कॉलेज हॉस्पिटलच्या त्याच्या तब्बल अडीच महिन्यांच्या दीर्घ आजारात ती नोट पुरून उरली हे एक विश्वास न बसण्यासारखं मोठं नवल होतं. ती नोट तोडून नारायणसाठी तीसचाळीस रुपयांची औषधी आणली गेली. उरलेले पैसे त्यानं त्याच निळ्या पाकिटात ठेवले. पहिली औषधि संपल्यावर पुन्हा दुसऱ्या औषधीसाठी त्यानं ते पाकीट उघडलं तो सुटे रुपये त्यात नाहीत. तीच शंभर

रूपयांची नोट कायम. ती पुन्हा तोडण्यात आली. पुन्हा सुटे रुपये त्या पाकिटात ठेवण्यात आले. पुन्हा गरज पडली तर सुटे रुपये त्यात नव्हते, शंभर रुपयांची ती नोट मात्र कायम होती. नारायणला ही एक जादूच वाटली. पण आता त्याला कसली भीति वाटत नव्हती. उलट एक प्रकारचा हुरूप, उल्हास त्याला एक वेगळेच नवजीवन प्रदान करीत होता.

डॉक्टरांनी आता नारायणला मेडिकल कॉलेज–हॉस्पिटलच्या परिसरात सकाळ–सायंकाळ सहल करण्यास परवानगी दिली होती. त्याच कॉलेजचा चाणाक्ष विद्यार्थी वासुदेव स्वेच्छेनं नारायणचा सहलीचा साथीदार झाला. सकाळी आंघोळ करून नारायण साडेसातचा चहा घेई नि मग सहलीला बाहेर पडे. त्याची सकाळची सहल हॉस्पिटलच्या पुढील दर्शनी भागाच्या बगिच्याकडे असे. एक हात सहलीचा साथीदार वासुदेवाच्या खांद्यावर व दुसऱ्या हाती सहलकाठी; अंगात खादीचा शुभ्र पायजामा व सदरा, सदऱ्यावर तपकिरी रंगाचं जॅकीट आणि खांद्यावर काळी शाल. अशा थाटात त्याची स्वारी मंद पावलं टाकीत बगिच्याच्या हिरवळीवर उमलत्या फुलांच्या विलोभनीय ताटव्यावर नजर रोखून बसे अन् मग हॉस्पिटलच्या टॉवरवरील भव्य घड्याळात दहाचे ठोके पडले की आऊट डोअर पेशन्ट्सची चौकशी करीत करीत तो आपल्या २३ नंबरच्या वार्डा-मध्ये प्रवेश करी.

त्याची सायंकाळची सहल विशेष असायची. चार वाजता चहा घेतला की तो सकाळच्याच थाटात आपल्या सहलीच्या साथीदारासह हरेक वार्डावार्डात प्रवेश करी. तेथील गरीब व दुःखी रोग्यांचा परामर्श घेई, त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न करी नि नंतर तो मेडिकल कॉलेजच्या दक्षिण दिशेकडच्या गुळगुळीत पायरीवर येऊन बसे.

ही जागा नारायणच्या खास पसंतीची होती. सायंकाळच्या साडेपाचनंतर सूर्यास्त होत असतांना, तो ज्या पायरीवर बसे त्याच्या पुढील प्रशस्त दिवाण-खान्यात चिमण्यांचे थवेच्या थवे एकत्रित होत आणि त्या निष्पाप जीवांचा अत्यंत कर्णमधुर ध्वनि त्याचं मन प्रसन्न करी. त्या चिमण्यांचं एक वेगळंच जग आहे—तें निर्विकार, निर्विकल्प असून, त्यात एकतेची व सहिष्णुतेची उदात्त शिकवण देणारं सामर्थ्य सामावलेलं आहे असं त्याला वाटे.

आजहि सायंकाळी नारायण त्या पायरीवर येऊन बसला. दिवाणखान्यातील चिमण्या नाचत होत्या. बागडत होत्या. चोचीला चोच भिडवून त्या आपला सद्‌भाव व्यक्त करीत, तर लगेच आपल्या पिलांना गोंजारून त्यांच्या चोचीत ममतेनं दाणे टाकीत. हे भावपूर्ण दृश्य नारायण एक टक लावून पहात होता. पण

अनुक्रमणिका

लगेच त्याची मुद्रा गंभीर झाली. त्याच्या बरोबर असलेल्या वासुदेवाच्या ते लक्षात येताच त्यानं विचारलं,

"का एकाएकी इतके गंभीर झालात? बरं वाटत नाही काय?"

नारायणनं वासुदेवावर एक करुण कटाक्ष टाकला आणि मग तो उद्गारला,

"वासुदेव, चिमण्याचं हे जग बघितलं की वाटतं आपलं मनुष्याचं हे जग किती बनावटी अन् स्वार्थी आहे. दुःखितांना आपण केवळ साध्या शब्दांनी सुद्धा दिलासा देऊ शकत नाही. उलट त्याच्या दुःखावर डागण्या देतो. या अवाढव्य मेडिकल-कॉलेज हॉस्पिटलचंच वातावरण लक्षात घ्या. मी रोज बघतो नि अनुभवतो, जर्जर झालेल्या रोग्यांना कशी वागणूक मिळते ती. हे रोगी माणसं आहेत आणि आपण नीट सुधारून काही दिवस जगावं म्हणून ते केवढ्या आशेनं इथं येतात. पण त्यांची इथं होणारी दुर्दशा, अनवस्था अन् अपमानीत स्थिति पाहिली म्हणजे हृदय ला कसा पीळ पडतो! नाही वासुदेव नाही, या निष्पाप, निर्विकार व सहृदय चिमण्यांपेक्षा आपण मानव अधःपतीत आणि क्षुद्र आहोत, क्षुद्र! नारायण जड अंतःकरणानं उठला आणि स्वतःचा तोल सावरीत आपल्या खोलीत आला. त्याला ती खोली किती भयाण, किती भेसुर वाटली!

तो लटलटतच पलंगावर पहुडला. त्याची नजर बाजूच्या दिव्यावर केन्द्रित झाली. काही वेळानं त्यानं आपले दोन्ही डोळे झाकून घेतले आणि बराच वेळ तो तसाच पडून राहिला; अन् कसल्या तरी विचारात गढून गेला.

नर्सनं हाक दिली तेव्हा त्याची विचारतंद्री भंगली. 'टेंपरेचर...' नर्स म्हणाली.

"नाही. माझं टेंपरेचर घेण्याची काही आवश्यकता नाही. नॉर्मल आहे तें. जा." काही न बोलता नर्स निघून गेली. नारायणच्या पुढं एका नर्स बाईच्या हातून थर्मामीटर फुटलं व ते फुटलं नाही असं दिसावं म्हणून ती त्या वार्डातील रोग्यांचा तापमानाचा तक्ता अदाजानेच भरून काढीत असल्याचं व एका रोग्याचा ताप भयंकर चढला असतानासुद्धा तिकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्याचं चित्र उभं राहिलं.

इतक्यात दुसरी नर्स आली. ती म्हणाली, "हूं. घ्या ही औषधि."

"नाही नर्स. मला औषधीची आवश्यकता नाही. जा."

नर्स मुकाट्यानं परत गेली. नारायणच्या पुढं दुसऱ्या एका वार्डातील अत्यंत खंगलेला रोगी केविलवाण्या मुद्रेनं नर्सला औषधि मागत आहे व ती त्याचेवर रागावून, "मरत का नाहीस, औषध औषध म्हणून कशाला ओरडतोस" असे कडक शब्द उच्चारीत त्याचेकडे घृणेनं पहात असल्याचं दृश्य उभं राहिलं.

थोड्या वेळानं नारायणच्या समोर जेवणाचं ताट आलं. त्या अन्नाकडे त्यानं टक लावून पाहिलं नि तो नोकराला म्हणाला,

" घनश्याम, उचल हे ताट; आणि कुणा गरीब रोग्याला नेऊन दे. मला जेवायची आवश्यकता नाही." घनश्याम निमूटपणे ताट उचलून खोलीबाहेर पडला. नारायणच्या पुढं तिसऱ्या एका वार्डांतील एक रोगी 'भूक भूक' म्हणून तळमळतो आहे; त्याचा एक पाय व एक हात गेला असून त्याला उठणं बसणं फारच कठीण झालं आहे पण अशा अपंग रोग्याला उत्तर दिलं जात आहे, " तुझ्या तोंडात घास घालून देऊ काय ? त्या कोपऱ्यात जाऊन मर ना. मेवामिठाईच भरली आहे तुझ्यासाठी." हे दृश्य उभं राहिलं नि तो पलंगावरून अंगात शक्ति नसताहि खाटकन् उठला. त्याच्या नजरेपुढं रोग्यांची अत्यंत आबाळ होणारी हृदयद्रावक दृश्यं एकापुढं एक सरकली आणि त्याचा आत्मा तळमळला !

नारायणनं निश्चय केला. उपोषण. रोग्यांच्या दुःखपरिमार्जनास्तव उपोषण स्वतःची आत्मशुद्धि. त्याशिवाय सात्विक समाधान नाही; अंतरात्म्याला स्वस्थता नाही. बस्स. आजच्या या रात्रीपासूनच उपोषण !

नारायण आजारी होता तो तीन कारणामुळं. निद्रानाश, रक्तक्षय नि अन्नद्वेष. निद्रानाश आहे म्हणून त्याला झोप आली पाहिजे; रक्तक्षय आहे म्हणून रक्तवर्धक इन्जेक्शने-औषधि-टॉनिक त्यानं घेतलं पाहिजे व अन्नद्वेष आहे म्हणून त्यानं भरपूर अन्न व फळं घेतली पाहिजेत. परंतु त्यानं आपल्या उपोषणात यापैकी काहीच करायचं नाही असं ठरवलं.

पहिला दिवस लोटला, दुसरा दिवस मावळला, तिसरा दिवसहि लोपला ना नारायण झोपी गेला, ना त्यानं औषध-पाणी घेतलं अन् ना त्यानं अन्नाला स्पर्श केला. चिंता ! नारायणासंबंधी भलतीच चिंता निर्माण झाली. अनेकांनी त्याला परोपरीनं समजावलं; काहीतरी मार्ग शोधून काढू म्हणून विनवलं. पण नारायण निर्धारापासून ढळला नाही-संकल्पात त्यानं खंड पाडला नाही-निश्चय त्यजला नाही.

चौथ्या दिवशी नारायणनं मौन धारण धारण केलं. संबंध दिवस त्यानं मूक प्रार्थनेत खर्ची घातला.

पाचवा दिवस उजाडला. वार्ड नं. २३ बेड नं. २७ ची खोली पाच दिवसापूर्वी केवढी उल्हसित, केवढी गजबजलेली नि केवढी आनंददायी होती ! ती आता अगदी भेसूर दिसत होती. सूर्याची कोवळी किरणं त्या खोलीत पसरली होती तरी तेथील प्रत्येक वस्तु उदास व खिन्न वाटत होती. नारायणची अवस्था तर अधिकच गंभीर,

अधिकच भयाण दिसून मन चरकत होतं ! काय करावं तें कोणाला काही सुचेना. थोड्या वेळानं काही डॉक्टरांसमवेत वार्डाचे प्रमुख पण अत्यंत प्रेमळ व निष्णात डॉ. लेले नारायणच्या परामर्शास आले. त्यांनी नारायणची नाडी पाहून विनम्रतेनं म्हटलं,

"विश्वास ठेवा. आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोत. तेव्हा आमचं ऐका आणि ··"

नारायणनं आपली शुष्क नजर डॉक्टरांवर रोखली. क्षणभर तो काहीच बोलला नाही आणि मग आपलं सर्व बळ एकवटून अत्यंत क्षीण आवाजात तो उद्गारला,

"डॉक्टर, माझा कोणावर रोष नाही, कोणाविरुद्ध तक्रार नाही. माझ्या दुबळे-पणावर मी रुष्ट आहे. कोणासाठी धाव घ्यावी, कोणाला चुचकारावं, कोणाला दिलासा द्यावा म्हणून माझं कांही कर्तव्य आहे, ते बजावण्यास मी असमर्थ आहे, याची मला खंत आहे, पण डॉक्टर··" नारायणचे डोळे पाणावले. तो करुण आवाजांत पण तळतळून म्हणाला,

"डॉक्टर, रुग्णालयातील रोग्यांचे जळते आत्मे काय म्हणतात ते पहा !" नारायणनं त्या रोग्यांची विविध उदाहरणें देऊन डॉक्टरांना त्यांची अत्यंत करुण अवस्था कथन केली.

डॉक्टरांनी आश्वासन देऊन दिलासा दिला.

नारायणनं दुपारीं उपोषण सोडलं. पण जे जे डॉक्टर किंवा सिस्टर्स नि नर्स भेटायचे त्या सर्वांना तो सांगे, "पहा हं, रोग्यांचे जळते आत्मे काय म्हणतात ते पहा आणि त्यांना दिलासा द्या. आपल्या प्रेमळ दोन शब्दावर, सहानुभूतीच्या साध्या वागणुकीवर त्या जर्जर झालेल्यांना, तळमळणाऱ्यांना तेवढंच हायसं वाटेल आणि ते आपल्याला दुवा देतील ! हे पुण्यकार्य आपल्या हातून घडू द्या."

नारायणनं उपोषण सोडलं त्या दिवसापासून सायंकाळी ४ ते ६ पर्यंत जवळपास रोज एक छोटासा वर्गच भरू लागला. भेटीला येणाऱ्या स्त्री-पुरुषांना नि बालबालिकांना तो निरनिराळी उदाहरणं नि स्वकर्तव्याचं महत्व पटवून देई आणि शेवटी कळवळून सांगे, "बघा बरं, माझे शब्द वाऱ्यावर विरून जाऊ देऊ नका. याची प्रचीति सर्वांना येणार म्हणून सावध असा."

वार्ड नं. २३ बेड नं. २७ च्या खोलीत अशा अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या. सुखदुःखाचे अनेक प्रसंग घडले. नागपूर विद्यापीठाच्या उपकुलगुरूंच्या निवडणुकी-साठी प्रकृति बरी नसताहि नारायण मतदान करायला गेला होता. दोन प्रबळ

अनुक्रमणिका

पक्षांत मोठी झुंज चालली होती. नारायणनं मतदानास जाऊं नये-दोन्ही पक्ष त्याला सारखे. उगीच गैरसमज होणार. याची जाणीव त्याला करून दिली असतांना सुद्धा नारायण मतदान करायला गेला-त्याला तसं प्रबळच कारण घडलं होतं. त्यानं आपल्या नेहमीच्या प्रवृत्तीनुसार टास् घेऊन मतदान केलं. कोणाला सुख नको, कोणाला दुःख नको. व्हायचा तो गैरसमज झाला नि तो त्यांच्या आजारी अवस्थेत मोठा महाग पडला. परंतु हा प्रहारहि त्यानं निमुटपणे सहन केला. ज्या त्याच्या एका वडया हितचिंतकानं गैरसमज केला, त्याला त्यानं उलट धन्यवादच दिले.

आणखी दुसरी एक अशीच घटना घडली. विदर्भ साहित्य संघाची निवडणूक आली. एका थोर साहित्य संस्थेची निवडणूक. मोठमोठया साहित्यिकात कमालीची चुरस निर्माण झाली. अध्यक्ष कोण होणार ? हा मुख्य चर्चेचा विषय. संस्थेचे काही ज्येष्ठ थोर साहित्यिक नारायणला भेटले. तो त्यांना म्हणाला, "गेल्या तीनहि खेपेला अध्यक्षपदाची उमेदवारी मी परत घेतली होती. मी माझी योग्यता व पात्रता जाणून आहे. साहित्य संस्थेचा अध्यक्ष साहित्यिक तर असावाच पण कर्तबगार व धमक राखणाराहि असावा. आज तर मी जर्जर अवस्थेत आहे तेव्हा..." अनेकांनी परोपरीने विनंती केल्यावरहि नारायणनं नकार दिला. पण असे असतांना सुद्धा प्रतिष्ठित साहित्यिक म्हणून मिरविणाऱ्या एका व्यक्तीने नारायणच्या बाबतीत जातिवाचक उल्लेख करून आपली मनोवृत्ति या स्वातंत्र्याच्या व परिवर्तनाच्या काळात दर्शविली. नारायणला हे जेव्हा कळलं तेव्हा तो काही क्षण स्तब्ध राहिला; आणि मग त्यानं त्या जर्जर अवस्थेतहि आपला निर्णय जाहीर केला,

"लढविणार ! विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाची निवडणूक या मरणखाटेवरूनहि लढविणार ! मी एक खेडुत, होय अगदी क्षुद्र खेडुत. दगडच म्हणा ना. पण या दगडातहि देवत्व आहे याची तीव्र जाणीव करून देणार आणि टीकाकारांनाहि त्या दगडाला फुलं वाहण्यास भाग पाडणार !"

निर्णय, नारायणचा कठोर निर्णय ! संकल्प, नारायणचा अढळ संकल्प ! त्याचा स्वभावच तसा – त्याच्या वृत्तीची घडणच तशी. आपल्या स्वाभिमानाला दुखविणारी – काही कारण नसताना आपला उपहास, उपमर्द करणारी एखादी गोष्ट घडली की नारायणचा आत्मा तळतळून उठे, तो रुद्रावतार धारण करी नि मग कोणतीहि पाशवी शक्ति आडवी आली तरी कोणाला रतिमात्र न जुमानता, आपली मान न वाकविता अथवा कोणाला शरण न जाता तो कठोर निर्धाराने प्राण पणाला लावून पाऊल पुढे टाकी. त्याचा हा निर्णय, हा संकल्प,

अनुक्रमणिका

असल्याचे त्याला वाटले. त्यांच्या मागोमाग डॉ. सयनानी नि डॉ. राजकोंडवार आणि डॉ. गायकवाड नि डॉ. गणवीर अन् तसेच वार्ड नं. २७ च्या सिस्टर्स नि नर्सेस या सर्वांचा जत्था आजहि आपल्यावर स्नेहाची वृष्टि करीत आहे असं वाटून तो सद्गदित झाला. नंतर त्याच्यापुढं समाचाराला येणारे त्याला परोपरीनं दिलासा देणारे पत्रपंडित, नामवंत लेखक, थोर कार्यकर्ते यांचं चित्र उभं राहिलं. त्यांची केवढी माया, केवढा जिव्हाळा, केवढं प्रेम ! नारायणनं दोन्ही कर जोडून त्या सर्वांना प्रणाम केला.

मध्यरात्र उलटून गेली तरी नारायण रम्य स्मृतीत गढून गेला होता. जवळपास तो आपलं अस्तित्व विसरून गेला होता. पण कसली तरी चाहूल लागून त्यानं दचकून पुढं नजर वळविली, नि तो तिकडे सारखा पाहातच राहिला. त्याच्यापुढं ती अज्ञात तरुणी–जिनं त्याला तो आजारी पडला असतांना आशीर्वाद मागितला होता–जिनं अडचणीच्या वेळी त्याला आर्थिक मदत केली होती–जिच्या दर्शनानं तो उल्हसित झाला होता उत्तेजित झाला होता—ती सुंदर तरुणी मंद हास्य करीत उभी होती. पूर्वीसारखंच विरविरीत शुभ्र वस्त्र तिनं परिधान केलं होतं. तिचे लांबसडक केस मोकळे होते. बोटांतील हिऱ्याची अंगठी लकाकत होती आणि—आणि तिच्या हातात एक टपोरी गुलाबकळी होती. निःस्तब्धतेचा भंग करून ती आपले तेजस्वी डोळे त्याचेवर रोखून त्याला म्हणाली,

"इतके टक लावून काय बघता ? ओळखलं नाहीत मला ?"

काही क्षण नारायण काहीच बोलला नाही. त्याला वाचाच फुटली नाही. ती अगदी त्याच्या समीप आली आणि आपला कोमल हात तिनं त्याच्या खांद्यावर ठेवला. त्याला सणसणल्यासारखं झालं. आणि मग तो काहीशा अस्पष्ट शब्दात म्हणाला,

"हां. बघितलं आहे तुला. अं तुझे—तुझे—" तो पुढं अधिक बोलू शकला नाही.

"तुम्ही उद्दईक घरी जाणार असल्याचं कळलं."

"हां. जाणार आहे."

"बरं केलंत घरी जाण्याचं ठरविलं. नाहीतर. . . "

"नाहीतर काय-काय झालं असतं ?" त्यानं कंपित स्वरात विचारलं.

"काही नाही. पण इथं आता अधिक दिवस राहणं इष्ट झालं नसतं." एक उसासा टाकून ती म्हणाली.

"म्हणजे ? काही अपाय. . . "

"हं. पण आता तसं काही नाही."

"पण काय घडणार होतं?" शंकेनं त्यानं तिच्याकडे मान वळवून विचारलं.

"तुमच्याविरुद्ध कट." ती चटकन उत्तरली.

"कट? माझ्याविरूद्ध कट? कोणाचा? का?" तो भयभीत झाला. त्याला दरदरून घाम सुटला.

ती अज्ञात तरुणी पलंगावर नारायणच्या अगदी शेजारी बसली. तिनं आपल्या पदरानं त्याच्या तोंडावरचा घाम टिपला नि मग तिनं विचारलं,

"काही दिवसापूर्वी एक स्त्री तुमच्याकडे मोटार घेऊन आली होती काय?"

नारायणनं होकारार्थी मान डोलावली.

"तिच्या बरोबर तुम्ही रामटेकला गेला होता काय?"

"होय. पण-पण हे तुला कसं काय कळलं?" काहीसं भेदरलेल्या नजरेनं तिच्याकडे पाहात त्यानं विचारलं.

"मला सगळी माहिती आहे. त्या स्त्रीनं तुम्हाला स्मीताबद्दल..."

स्मीताचं नाव घेताच नारायण कावराबावरा झाला. त्याला पुन्हा कंप सुटला. तो अडखळत म्हणाला,

"स्मीताला मी माझी सर्व शक्ति एकवटून मदत केली आहे, पण-पण गैरसमज झाला आहे तिच्या थोरल्या वहिणीचा आणि म्हणून..."

"हां. तेहि मला माहित आहे. स्मीताची तुमच्यावर मोठी श्रद्धा आहे. परंतु तिच्या वहिणीची-जिनं तुम्हाला रामटेकला नेलं तिची एक वेगळीच अपेक्षा होती. म्हणून तिनं स्मीताचं नाव घेऊन तुम्हाला एक जबाबदारी पार पाडायला सांगितलं आणि तुम्ही ते काम केलं नाही म्हणून..."

"म्हणून काय?"

"तिनं तुमच्या विरुद्ध कट निर्माण केला होता."

"अस्सं." नारायणनं एक उसासा टाकला.

"पण आता ती काही करू शकणार नाही. तिनं तुम्हाला पुरतं ओळखलं होतं. असू द्या ते. परंतु आता तुम्ही घरी जाणार हे बरं झालं. हां. पण पुन्हा तिला बळी पडू नका. नाहीतर कदाचित्..."

नारायण काहीच बोलला नाही. तो काहीसा गंभीर झाला. ती तरुणी म्हणाली,

"आता तुम्हाला चिंता करण्यासारखं काही नाही. त्या स्त्रीचा कट आम्ही

उलथून पाडला. या कामी स्मीताची मोठी मदत झाली. तिनं तुम्हाला प्रणाम सांगितला."

तो त्या सुंदर तरुणीकडे नजर रोखून गंभीरपणेच म्हणाला,

"तुझे मोठे उपकार आहेत."

"उपकार? छे! तुमचेच आम्हावर अनंत उपकार आहेत बरं! आता येतें मी."

ती उभी झाली आणि तिनं नारायणला लवून प्रणाम केला. त्यानं पुन्हा तिच्याकडे रोखून पाहिलं; आणि म्हटलं,

"तुझ्या उपकाराची फेड करायला मी असमर्थ आहे. पण..."

"पुन्हा असं बोलून मला लाजवू नका. आम्हाला फक्त आशीर्वाद हवा—आशीर्वाद." विनयपूर्वक ती म्हणाली, आणि तिनं नारायणला आपल्या हातातील गुलाबकळी भेट दिली. तिचा स्वीकार करीत तो म्हणाला,

"स्मीताला माझा निरोप सांग. मजकडून काही कसूर झाला असेल तर क्षमा कर म्हणावं. माझा तुम्हा दोघींना आशीर्वाद आहे." त्यानं आपला हात आशीर्वादासाठी उंच केला. त्या तरुणीनं पुन्हा त्याला प्रणाम केला नि डोळ्याचं पातं लवतं न् लवतं तो ती अदृश्य झाली.

नारायण पुन्हा विचारात मग्न झाला. आपण स्वप्नावस्थेत तर नाही ना? मग ही गुलाबकळी? ती अज्ञात तरुणी कोण? तिची आपल्यावर एवढी मेहरनजर का? आपल्या विरुद्ध कट करण्यात त्या मायावी स्त्रीचा हेतु कोणता असावा? या सर्व प्रश्नांनी तो बेचैन झाला. पहाट झाली तरी तो तसाच विचारमग्न होता.

"मग आज तुम्ही घरी जाणार ना?" खोलीत प्रवेश करून एका सिस्टरनं विचारलेल्या या प्रश्नानं नारायणची विचारतंद्री भंगली. तो चपापून उत्तरला,

"होय." तो पलंगावरून खाली उतरला, आणि घाईघाईनं सामानाची आवराआवर करू लागला.

थोड्याच वेळात नारायणला निरोप द्यायला त्याच्या हितचिंतक स्त्रीपुरुषांचा घोळका जमला. त्यापैकी अनेकांनी त्याला आणखी काही दिवस राहण्याचा आग्रह केला. त्याला त्या अज्ञात तरुणीचे शब्द आठवले, "आता मोहाला बळी पडू नका." तो सर्वांना प्रणाम करून म्हणाला,

"आपणा सर्वांच्या जिव्हाळ्याबद्दल मी फार आभारी आहे. मला आता

घरी गेलंच पाहिजे. असाच जिव्हाळा, असाच कृपालोभ असू द्या." नारायण गहिवरला.

निरोप द्यायला आलेली मंडळी खोलीबाहेर आली पण नारायण मात्र त्या खोलीत घुटमळत राहिला. त्यानं आपला २७ नं. चा पलंग पुनःपुन्हा न्याहाळला. ममतेनं त्यानं त्यावरून हात फिरविला. मग त्याला वंदन करून, त्या अज्ञात तरुणीनं भेट दिलेली गुलाबकळी त्यावर ठेवून, जड अंतःकरणानं खोलीबाहेर त्यानं पाऊल टाकलं.

नारायण खोलीबाहेर पडला खरा, पण त्याची पावलं पुढं पडेनात. त्यानं वळून वळून वार्ड नं. २३ मधील आपल्या बेड नं. २७ च्या जिव्हाळा, प्रेम नि निष्ठा प्रदान करणाऱ्या खोलीकडे साश्रु नेत्रांनी पाहिलं. नंतर त्यानं निरोप द्यायला आलेल्या स्नेहीमंडळीवर नजर टाकली आणि मग त्यानं विचारलं,

"सर्व आलेत पण राज कुठं आहे ?"

"ड्युटीवर" मीरा उत्तरली.

"ड्युटीवर." तो पुटपुटला.

"वार्ड नं. १२ वर तिची ड्युटी आहे." मीरा म्हणाली.

"तिची फार इच्छा होती भेटायची" सौदामिनी नि प्रमिला म्हणाली.

"हां. आम्हालाहि काल सायंकाळी ती भेटली असतांना म्हणत होती, बाबाला भेटायचं आहे म्हणून" उषा नि प्रभा यांनी पुस्ती जोडली.

"राज ?" एक हसरी, गोड स्वभावाची नर्स. नारायणला ती वडिलकीचा मान देऊन बाबा म्हणायची; आणि तो तिचेवर स्वतःच्या मुलीप्रमाणेच प्रेम करायचा.

"राजला भेटल्याशिवाय मला कसं जाता येईल ? हां. मला तिला भेटलंच पाहिजे." असं म्हणून तो वार्ड नं. १२ कडे गेला. निरोप जाताच राज धावत धावत भेटायला आली. तिच्या डोळ्यात आसवं तरळलीं. नारायणच्या चरणाला वंदन करून ती भरल्या कंठानं म्हणाली,

"बाबा, क्षमा करा आपल्या राजला. इच्छा असूनहि मी भेटायला यऊ शकले नाही. आपल्यालाच यावं लागलं."

"राज बेटा, माझं कर्तव्य आहे हे"

"बाबा, कांही दिवस आणखी थांबा नं."

"नाही बेटा, नाही."

"आता केव्हा दर्शन घडेल बाबा ?" तिच्या गालावर अश्रु ओघळले.

"मी जिवंत आहे तोपर्यंत. पण माझा काय भरवसा पोरी. मी आज आहे उद्या नाही."

"नाही बाबा नाही. असं बोलू नका. मी मोठी अभागी आहे बाबा ! माझ्या मायेचं असं कोण आहे ? पण तुम्ही मला देवासारखे भेटलात. थोड्याच दिवसांत वडिलाचं प्रेम मला दिलंत. विसरू नका बाबा मला." तिनं हुंदका दिला.

"आवर बेटा, ते अश्रु आवर. मी तुम्हा सर्वांबरोबर आहे. विश्वास ठेव, तुझी हाक केव्हाहि आली तरी ओ अवश्य मिळेल." त्यानं मोठ्या प्रेमानं तिची पाठ थोपटली.

नारायण खाली उतरला. राज अश्रूंनी डबडबलेल्या नेत्रांनी त्याचेकडे पाहात तशीच उभी होती. खालच्या पायरीवर त्याचा सहलीचा साथीदार वासुदेव उभा होता. त्याच्या खांद्यावर हात ठेवून नारायण म्हणाला, "वासुदेव, माझ्या आजारांत तुम्ही दिलेली साथ अविस्मरणीय राहील."

नारायण मोटारींत बसला. त्याची नजर दुसऱ्या मजल्यावरील वार्ड नं. १२ वर गेली. राज त्याच्याकडे पाहात उभीच होती. अश्रु टिपत तिनं रुमाल हालविला.

"आनंदात रहा राज, आनंदात रहा" -त्यानं हात बाहेर काढून तिला आशीर्वाद दिला. मग निरोप देणाऱ्या सर्व हितचिंतकांना प्रणाम केला. सर्वांचं हृदय भरून आलं. मोटारीचा भर्रर आवाज झाला. मोटार पुढं पुढं सरकत होती पण नारायणचा आत्मा मात्र वार्ड नं. २३ मधील बेड नं. २७ कडे झेप घेत होता !

卐

अनुक्रमणिका

'विचारांचे विषय'——शंका जिज्ञासा

लेखक——जिज्ञासु

युगवाणीच्या डिसेंबर १९५९ च्या अंकापासून "विचारांचे विश्व" या नावाचे एक नवे सदर सुरू करण्यात आले असून," आधुनिक बुद्धिवादाने जनमनात प्रसृत केलेले व मान्यता पावलेले असंख्य भ्रम दूर सारण्याचा प्रयत्न या विचारांच्या विश्वात वारंवार करण्यांत येईल", अशा शब्दांत या सदराचे संकल्पित स्वरुपहि स्पष्ट करण्यात आले आहे. श्री. साक्षी यांनी प्रवर्तित केलेला हा उद्योग सद्यःकाली अत्यंत समुचित आणि म्हणूनच प्रशंसार्ह आहे यांत संशय नाही. तथापि, पुढील लेखांक लिहिण्यापूर्वी या पहिल्याच लेखातील काही अंश अधिक स्पष्ट होईल तर बरे असे वाटतें.

विचार म्हणजे काय ?

(१) विचार म्हणजे काय हे "काटेकोरपणे" स्पष्ट करताना विचार या शब्दांतील मूळ धातु विच् आहे, चर् नाही हे "कटाक्षाने" ध्यानात घ्यावयास हवे, "विचार या शब्दाचा विचार करताना चर् या धातूवर जोर नसून विच् या धातूवर, धात्वर्थावर जोर असतो हें प्रथमतःच व पक्केपणी ध्यानांत घेतले पाहिजे", अशी श्री. साक्षी यांची सूचना आहे.

ही सूचना करताना विच् या धातूपासून विचार हा शब्द कसा सिद्ध होतो हे साधार सांगणे अवश्य होते. कारण असा काही प्रकार संभवत नाही, अशी माझ्यासारख्या अल्पज्ञांची समजूत आहे.

(२) चर् व विच् या धातूंच्या आधारे विचाराचे आणखी विवेचन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.—

चर् म्हणजे चलन करणे, चालणे, भटकणे, दिशाशून्य रीतीने विहार करणे. चालणाऱ्याला विवक्षित नेमक्या दिशेलाहि जाता येते, पण हे विचाराबाचून संभवत नाही. केवळ चलन, चालणे, भटकणे हे चर् या धातूतून निर्दिष्ट होते, पण विशिष्ट दिशा, विशिष्ट हेतु, विशिष्ट साध्य यांना अनुलक्षून गतिमान होताच त्या चलनाला गमनाला, भ्रमणाला विचारांचे, विच् या धातूचे, या धात्वर्थाचे अंग जोडले जाते." "विच् म्हणजे विलग विलग करणे, स्पष्ट रेखीव अर्थावबोधासाठी विभाग करणे, भेद करणे, अंगांग अलग अलग करून ज्ञेय वस्तूचे सर्वांगपरिपूर्ण दर्शन घेणे."

'वि' अधिक चर् = विचार

हे विवेचन करताना चर् हा धातु केवळ चलन याच अर्थाचा वाचक आहे' अशी श्री. साक्षी यांची समजूत असल्याचे दिसून येते. ती तशी असेल तर बरोबर मात्र नाही. कारण चर्-चरति हा भ्वादि गणातील धातु जशा गत्यर्थक आहे (अभ्रवभ्रमभ्रचर गत्यर्थाः) तसाच चर्-चारयति-ते हा चुरादि गणातील धातु संशयार्थी आहे (चर्संशये). या संशयार्थी चर् धातूला "वि" हा उपसर्ग "अनाभिमुख्य" या अर्थी लागला म्हणजे वि-चर् हा धातु असंशयार्थी होतो. आणि त्याला पुढे "अकर्तरि च कारके संज्ञायाम्" (३.३.१९) या सूत्रानुसार घञ् प्रत्यय लावला म्हणजे "असंशय" "निश्चय" या अर्थाचा "**विचार**" हा शब्द सिद्ध होतो, हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

तसेच, "विचारात गोंधळाला यत्किंचित्हि स्थान नसते" असल्या स्पष्टीकरणाच्या द्वारे श्री. साक्षी यांना विचार या शब्दांतून जो अभिप्राय अभिप्रेत आहे, तोच नेमका उपर्युक्त वि-चर् धातूत्पन्न असंशयार्थी विचार या शब्दातून व्यक्त होत असल्याचेहि दिसून येते.

आपटयांच्या संस्कृत शब्दकोशात विचार शब्दाचे दिलेले अर्थ पाहणेहि या संदर्भात उद्बोधक होईल. deliberation, decision, determination इ. अर्थ तर त्यात दिलेले आहेतच; परंतु, गत्यर्थक चर् धातूपासून निष्पन्न होऊं शकेल असा एकहि अर्थ तेथे नोंदलेला नाही हे विशेष.

अशा स्थितीत विचार शब्दातील तथाकथित चर् हा धातु गत्यर्थकच आहे' अशा समजुतीने श्री. साक्षींच्या या विचाराने चर् धातु सोडून देऊन विच् च्या मागे का लागावे, याचा उलगडा झाला नाही.

(कोशकार आपटयांनी वरील अर्थाच्या यादीत doubt, hesitation हेहि विचार या शब्दाचे अर्थ दिले आहेत. अर्थात् या ठिकाणी वि हा उपसर्ग "अतिशय" किंवा "उत्कर्ष" या अर्थाचा वाचक असून तो "चारा"तील म्हणजे संशयातील अतिशय किंवा उत्कर्ष दाखवितो हे उघड होय.)

(३) "विचार या शब्दाचा विचार करताना चर् या धातूवर जोर नसून विच् या धातूवर, धात्वर्थावर जोर असतो", हे "पक्केपणी" ध्यानात घेण्यास सांगणाऱ्या साक्षींनीच पुढे मात्र "विचारी या शब्दाच्या उपयोगात विच् पेक्षा चर् या धातूचे, धात्वर्थाचे प्राबल्य ध्वनित होते", असे म्हटले आहे.

अधिक विवेचनाची आवश्यकता

यातील संगति अर्थात ध्यानात येत नाही. कारण विचार हा शब्द कशा-पासून सिद्ध झाला हा प्रश्न बाजूला ठेवला तरी विचार व विचारी या दोन शब्दा-तील धातु व धात्वर्थ एकच राहणार.

तसेच एखाद्या शब्दात विशिष्ट "धातूवर, धात्वर्थावर जोर असतो", आणि एखाद्या शब्दात विशिष्ट "धातूचे, धात्वर्थाचे प्राबल्य ध्वनित होते", म्हणजे काय? विशिष्ट शब्दात कोणता धातु वा धात्वर्थ अनुस्यूत मानावा याबद्दल मतभेद संभवला तरी विशिष्ट मतानुसार विशिष्ट शब्दात विशिष्ट धातु, धात्वर्थच अनुस्यूत असतो; स्वमतविरुद्ध धातूला वा धात्वर्थाला त्यात गौणत्वाने वा अंशतःहि अवसर नसतो. एकच शब्द अनेक अर्थांचा वाचक असतो तेव्हा देखील ते सर्व अर्थ प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने पण कोणत्या तरी एकाच धातूशी संबद्ध असतात. अर्थात् श्री. साक्षी यांच्या उपरिनिर्दिष्ट विचारातहि अधिक विवेचनाची आवश्यकता जाणवते.

(४) विच् या धातूचा अर्थ श्री. साक्षी यांनी "विलग विलग करणे.: विभाग करणे, भेद करणे, अंगांग अलग अलग करणे..." असा दिल्याचे वर उद्धृत केले आहेच. "असे जो करू शकतो त्याला विचक्षण म्हणतात" असे त्या-पुढेच त्यांनी म्हटले आहे. "विचार म्हणजे विचक्षणा, विशेषण ईक्षण, दर्शन", असेहि त्यांनी आणखी सांगितले आहे.

'विचक्षण'?

विच्, विचक्षण, विचार, विशेषण ईक्षण, दर्शन यांच्यात विशिष्ट आर्थिक संबंध आहे हे जितके खरे, तितकेच तो क्रमवार उलगडून दाखविणेहि उद्बोधक आहे. तथापि, श्री. साक्षी यांनी केलेल्या विवेचनावरून विचक्षण या शब्दाविषयी निदान वाचकांचा तरी घोटाळा होण्याची बरीच शक्यता वाटते. कारण विच् धातूच्या अर्थविवेचनाच्या अनुषंगाने विचक्षण हा शब्द त्यांनी योजलेला असला तरी या शब्दातील धातु ज्याप्रमाणे विच् नाही, त्याचप्रमाणे विचार म्हणजे विचक्षणा, विशेषण ईक्षण, दर्शन असे त्यांनी म्हटले असले तरी ईक्ष् याहि धातूचा विचक्षण शब्दाशी संबंध नाही. "वि-चक्ष्" या धातूला "अनुदात्तेतश्च हलादेः" (३. २. १४९) या सूत्रानुसार युच् प्रत्यय लागून विचक्षण हा शब्द सिद्ध झाला आहे. तात्पर्य, "स्पष्ट व रेखीव अर्थावबोधासाठी" याहि बाबतीत अधिक विवेचन अवश्य वाटते.

(५) विचार म्हणजे काय ते विशद करताना "दिशाशून्य, हेतुशून्य, लक्ष्यशून्य, बेताल, मनातल्या मनात होणाऱ्या भ्रमणाला विचार म्हणत नाहीत", इत्या विवेचन करण्यात आले आहे. तसेच चर् म्हणजे "दिशाशून्य रीतीने विहार करणे

चर् या धातूने "केवळ चलन" निर्दिष्ट होते. इ. साक्षीकृत स्पष्टीकरणहि वर आले आहेच.

या सर्व विवेचनातून श्री. साक्षी यांना एकंदरीत काय म्हणावयाचे आहे ते समजले तरी, चलन, केवळ चलन, भ्रमण हे दिशाशून्य, हेतुशून्य, लक्ष्यशून्य कसे असू शकेल ? हा प्रश्न शेष राहतोच. कारण कोणतेहि चलन मग ते शारीरिक असो अथवा—"अनुयास्यन् मुनितनयां सहसा विनयेन वारितप्रसरः।–स्थानादनुच्चलन्नपि गत्वेव पुनः प्रतिनिवृत्तः" (शाकुंतल) या दुष्यन्तोक्तीत म्हटल्याप्रमाणे मानसिक असो, ते हेतूशिवाय संभवतच नाही, असा अनुभव असून विचारवंतहि तसेच सांगतात. असो.

सूचना

"हा पहिला लेख म्हणजे सलामीचा पहिला बाण आहे" असे श्री. साक्षींनी म्हटले असून "ज्याला आपल्या अपूर्णतेची, अल्पज्ञतेची जाणीव नसते तो मुक्त; पशु अथवा अभिजात मूढ यापैकी कोणी तरी असतो. त्याच्यासाठी हा यत्न आरंभिलेला नाही", असेहि प्रस्तुत लेखाच्या शेवटी त्यांनी "प्रथमतःच सांगून टाकलेले" आहे. वस्तुतः इतके टाकून सांगण्याचीहि आवश्यकता नव्हती. तथापि आपल्या या शरसंधानात श्री. साक्षी यांनी उद्बोधकतेला बोधकतेची, निर्भीडपणाला नेमकेपणाची आणि प्रतिपादनाला आगमोपपत्तीची जोड द्यावी म्हणजे वाचकांचे हाल होणार नाहीत आणि लेखनातील उद्दिष्टहि सिद्ध होईल, अशी सूचना त्यांना विनंतीपूर्वक करावीशी वाटते.

★ ★ ★

'साक्षी'चे उत्तर

श्री. जिज्ञासु यांचा लेख मननपूर्वक वाचला. मला तो फार उद्बोधक वाटला. वाचकांनाहि वाटेल अशी माझी खात्री आहे.

मी वैयाकरणी नाही, असे मला प्रथमतःच सांगून टाकले पाहिजे. श्री. जिज्ञासु हे या शास्त्रात पारंगत असावेत, असे स्पष्ट दिसते. त्यांचे शास्त्रसंमत म्हणणे मला सर्वस्वी मान्य आहे.

"या सर्व विवेचनातून श्री. साक्षी याना एकंदरीत काय म्हणावयाचे आहे ते समजले तरी..." जो प्रश्न शेष राहतो त्यावरीलहि श्री. जिज्ञासु यांचे म्हणणे विचारार्ह आहे, यात शंका नाही. पण हा 'शेष' राहणारा प्रश्न माझ्या विचाराचा विषय झालेला नाही, एवढेच मी सांगू इच्छितो. एकंदरीत मला काय म्हणावयाचे आहे, एवढे जरी वाचकांना कळले तरी माझा कार्यभाग झाला, असे मी मानतो.

अनुक्रमणिका

शेवटी 'इतके टाकून सांगण्याचीहि आवश्यकता नव्हती'—हे श्री. जिज्ञासूचे विधान मला मान्य आहे. या अपराधाबद्दल क्षमा मागण्याखेरीज माझ्याजवळ अधिक काही उरलेले नाही.

वाचकांचे हाल

श्री. जिज्ञासुसारख्या जाणकार व चिकित्सक वाचकांचे 'हाल' होणे, हे अपरिहार्यच मानले पाहिजे. कारण बोधकता, नेमकेपणा व आगमोपपत्ति या सर्वांचे नित्य व काटेकोर अवधान बाळगून लेखन करणे, माझ्या वकूबाच्या पलीकडचे आहे. मला जे सांगावयाचे आहे ते कळले व त्यावरच अवधान ठेवून माझे लेखन तपासले तर 'हाल' बरेच कमी होण्याचा संभव आहे. त्यात बोधकता व नेमकेपणा पुरेशा प्रमाणात मिळावा, अशी माझी आशा आहे. 'आगमोपपत्ति' मात्र माझ्या अभ्यासाचा अद्याप विषय झालेली नसल्यामुळे त्याबाबत श्री. जिज्ञासुसारख्या वाचकांना वारंवार 'हाल' सहन करावे लागणार, हे ओघानेच आले. आगमोपपत्तीबाबतचा माझ्या पहिल्याच लेखातील प्रयत्न वैयाकरणी स्वरूपाचा नव्हता, तर केवळ मला अभिप्रेत असलेला मुद्दा स्पष्ट करण्यापुरताच मी 'विच्' व 'चर्' या धातूंच्या अर्थासाठी आपटयांच्या कोशाचा आधार घेतलेला होता. श्री. जिज्ञासु यांच्या लेखामुळे माझा मुद्दा अधिक स्पष्ट झालेला आहे; कारण मी दुर्लक्षिलेल्या गोष्टीकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. याबद्दल त्यांना जितके धन्यवाद द्यावेत, तितके थोडेच होतील.

—'साक्षी'

ता. क.

श्री. जिज्ञासु यांचा लेख प्रसिद्ध होण्यास जो विलंब झाला, त्याची जबाबदारी संपादकावर नसून माझ्यावरच आहे. या विलंबाबद्दल जिज्ञासूंची क्षमा मागतो. तरीपण 'विचारांचे विश्व' या सदरात जे आजवर लेख आले ते वाचून 'जिज्ञासूं'चे फार हाल झाले नसावेत, अशी मी आशा करतो.

—'साक्षी'

卐

अनुक्रमणिका

साहित्य–समीक्षा

' शांतारामां 'चे कथाविश्व

समीक्षक प्रा. या. मु. पाठक

' शिखा '* या कथासंग्रहाच्या निमित्ताने ' शांतारामां 'च्या कथाविश्वाचे ओझरतें दर्शन आज घडवायचे आहे. ४५ ते ५४ या नऊ वर्षातील त्यांच्या या १४ निवडक कथा, सत्यकथा, मौज आणि हंस यात प्रसिद्ध झालेल्या. बहुतेक दिवाळीच्या खास अंकातल्या. मौज प्रकाशनाने पुस्तक प्रसिद्ध केलेले. या साऱ्या लौकिक यशाने समीक्षकाच्या मनावर दडपण यावे. ' प्रथितयश ' हा सवंग शब्द उच्चारण्याच्या पलीकडे त्यांची पोच गेलेली. फार तर ते आता ' फॉर्मा'त नाहीत एवढीच कोणी तक्रार करील. त्यांच्याविषयीच्या अपेक्षा बेसुमार वाढल्या आहेत याचाच हा पडताळा. आजच्या आघाडीच्या पाच लघुकथा–लेखकात त्यांचे नाव हरवू नये. शांताराम आणि भावे हे विदर्भातील कथाविश्वाचे तर चंद्र सूर्यच ! विदर्भात राहून सर्व मराठी मने उजळायचे असे भाग्य फार थोडयांच्या नशिबी !

' दुर्बोधत्व हे नवसाहित्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे ' असा गाडगीळांचा ठाम शोध. शांतारामांच्या कथात काय आहे हे सांगणे सोपे नाही. पण दुर्बोधत्व नाही हे कुणालाहि मान्य व्हावे. या दृष्टीने पाहिले तर शांतारामांच्या कथा या नवकथा ठरू नयेत आणि तरीहि त्यांनी एवढा दर्जा कमवावा, हे आजच्या काळात नवलच !

बदलत्या काळाच्या खुणा

हे यश लाभायचे कारण बदलत्या काळाच्या खुणा शांतारामांच्या कलेत उमटल्या आहेतच. रहस्याची उकल, अनेक अडथळयानंतरचे प्रेममीलन या विषयांची वाफ केव्हाच उडून गेली. तो अनेक उकळयांचा कडकड काढा येथे चाखावा लागत नाही. जिज्ञासा, उत्कंठा, उकल हा साचेबंद ताळा आता चालायचा नाही. ओ हेन्‌रीची धक्का देणारी कलाटणी आता इतकी शिळी झाली की तिचा वास येताच नाक वर जावे.

---

* शिखा— (कथासंग्रह) लेखक : शांताराम, प्रकाशक : मौज प्रकाशन, खटाववाडी, मुंबई नं. ४.

आपल्या अपुऱ्या अधुऱ्या जीवनात बहुतेक समस्या न सुटलेल्याच असतात. कोडी उलगडत नाहीत. गणिताची उत्तरे जुळत नाहीत. कथेत सगळे धागेदोरे जुळवून दाखवायचे. Q. E. D. पाहून वाचकांनी समाधानाचा सुस्कारा सोडायचा. आपल्या कल्पनेच्या खेळाने लेखकाने असे बनावट जीवनदर्शन घडवायचे—हे सारे आता गेले. आता जशी जीवनात हुरहूर तशी कलास्वादांत हुरहूर. हुरहूर हेच सुख. आशय आणि अभिव्यक्तीच्या कथा आता अमर्याद विस्तारलेल्या. साराच सूक्ष्म कौशल्याचा खेळ. म्हणूनच कोणत्याहि लेखकाच्या एखाद्या कथेचीच मान ताठ असते तर अनेक कथा कोलमडतात. वस्तुनिष्ठता गेल्यावर राहते फक्त आत्मनिष्ठ लेखन आणि ओघानेच आत्मनिष्ठ वाचन. अर्थातच प्रत्येकाची आवड निवडहि जागरूक. एखाद्याच कथेवर मन तरंगत राहते तर बाकीच्या सरळ डोक्यावरून निघून जातात. मग वाचकांच्या नशिबी गुदमरणेच तेवढे येते. पण त्या गुद्‌मरण्यांतहि एकप्रकारची मौज आहे. त्यासाठीच तर आजची कथा वाचायची.

वळण

शांतारामांच्या 'वळण' या कथेत त्यांनी आपली वरची पातळी गाठली आहे. येथे सखोल अनुभव साकारला आहे. आणि तोहि किती सहजतेने आणि खेळकरपणाने. आपल्या दोन वर्षांच्या मुलीशी वडिलांनी अबोला धरला. कां ? तर आईचे सेन्सारबोर्ड बसले आणि ठराविक दांभिकतेची पोपटपंची तिला शिकवण्यात आली. तिचे निरागस साधे बोल त्याला हवे होते. 'तू आईची की बाबांची ? कुणाची ?' या खेळकर प्रश्नाला ती 'आपण सर्व देवाची मुले' असे उत्तर देऊ लागली. पतिपत्नीच्या दृष्टिकोनातील अंतर ही शोकात्मका घडवायला कारणीभूत झाले. मुलीला वडिलांनी प्रश्न विचारावे, तिने मोकळी उत्तरे द्यावीत. आईला ती आवडू नयेत. वडिलानीच ती शिकवली असा तिने ठपका द्यावा. एकदा मुलीने विचारले 'आईचा पापा गोड की कडू ?' बापाने संकोचाने सांगितले 'आंबट,' या खेळकरपणाची प्रतिक्रिया भलतीच घडली. आईने शिष्टांची दांभिक भाषा शिकवण्याचा विडाच उचलला. आणि मुलीचे स्वयंस्फूर्त निरागस बोल आता ऐकायला मिळायचे नाहीत म्हणून वडिलाने मौन पत्करले.

'दिवाकर कृष्णा'सारखा करुण रस येथे हृदयाचे पाणी पाणी करणार नाही. पण बालमनातून दांभिक मानव कसा आकार घेतो याचे भाष्य न करता केलेले किती सहज दर्शन येथे घडते. आजच्या सुसंस्कृत दांभिक मानवतेची घडण कशी होते याची एक छटा येथे सहजतेने रंगविली गेली. पति-पत्नीत असलेल्या तफावतीचाहि अवांतर ठसा उमटला.

' शिखा '

' शिखा ' या गोष्टीचा मात्र तो प्रमुख विषय आहे. उन्हाळयाने उकडलेला पति घरी आणलेल्या कागदपत्रात डोके खुपसणार तोच पावसाचे शिरवे येते. त्याच्या वृत्ति उल्हसितात. पत्नीने पावसात आपल्याबरोबर भिजत हिंडावे असा त्याला मूड येतो. त्यावेळी ती मात्र संथ असते. पुन्हा तो कामात गर्क होतो तेव्हा पत्नीला इंद्रधनुष्य वेड लावते. पण तोपर्यंत याचा मूड गेलेला असतो. ही अनेक संसारातली नेहमीचीच साधी शोकांतिका. पण म्हणूनच तर ती हृदयाला चटका लावून जाते.

"**नशा**" या कथेची नशाहि मोठी तर्रर्र करणारी आहे. आजच्या 'ओल्या' भागातील शिष्ठांच्या क्लबचे जीवनदर्शन येथे हुबेहुब घडते. धुंदी उतरताच सकाळच्या उजेडात मात्र ती 'दोस्ती' प्रतिष्ठेला चालत नाही. दर्जा व रुवाब यासाठी पुन्हा मुखवटे घ्यावे लागतात. या सर्व दांभिकतेचा वाचकांना आपोआप उबग यावा. नवकाव्यातील तुच्छता–विफलता यांच्या भडक छटाहि येथे प्रकट होत नाहीत. चांगले की वाईट या ऐवजी 'असे आहे बाबा' हेच मंदगतीचे पार्श्वसंगीत घुमत राहते. आणि त्या संथपणाने वाटते की पाल्हाळ तर नाही ना हा ? तसा एखादे वेळी तो असेलहि. गोष्टीचा धागा नसला तर कथेच्या जीगटिकल्या दगा देतात. कधी तुटल्यागत होते तर कधी पदकाच्या आकारात बेडौल येतो. आकृतिबंध तर आधीच सुटलेला असतो. मग उरते आडवे तिडवे फोफावणे. काय आवश्यक आणि काय नको हे ठरवताना मग वाचकांच्या मूड-वरच सारी भिस्त ! लेखकाचा मूड भलतातच भडकला की याचा नेमका तेव्हाच थंडावतो. आणि कथा ढासळते. अगदी लॅंडस्लिप् सारखी ! मग कुरकुर सुरू होते–'पाल्हाळ पाल्हाळ !' पण नशेचे यश वादातीत असावें.

"**वाढवेळ**" या कथेत घटना घडतच नाही. प्रवासातला एक मूड, सर्वांच्या आंगवळणी पडलेल्या प्रवासी दु:खांची आलेली उबग आणि रात्रीचे अंधारातहि तकतकलेले मुग्धरम्य घरांचे दर्शन ! वखवखलेल्या मानवी कोला-हलाच्या घाणीतून अलगत उंच उंच उडून जाणारे एक कावलेले प्रसन्न मन ! असली कथा म्हणजे एक मूडचेच केवळ दर्शन. या कथेला आगा आहे गोष्टीसारखा, पण् पीच्छा असा नाहीच ! सर्वे जन्तु रुटिनाः हीच पुसट सूचना आणि शेवट. पण मग इथेच का थांबायचे, हा प्रश्नच पडतो. कुठून तरी निघायचे अन् कुठे तरी जायचे. . प्रवासवर्णन, कथा की जीवनभाष्य का वास्तवदर्शन ? मग साध्या-भोळया वाचकाला अखेरीस वाटते आपण काय वाचले बुवा ? कशासाठी वाचले ?

कथा गडगडली तरी पुढे काहीतरी असेल या हुरहुरीतच तुटते सारे–पण जीवनातहि क्षणोक्षणी असेच काहीतरी तुटत–संपत नाही का ?

'**कंटाळा**' या कथेचा विषय बेफिकीर खुशाल चेंडूंना आणि आनंदवादी पळपुटयांनाच कंटाळवाणा व्हावा. यांत्रिक जीवनातला तोच–तो–पणा खुपतो. पण प्राण संकटातून बचावल्यानंतर त्याच जीवनात लज्जत वाटू लागते, हा या कथेचा विषय. इथल्या निसर्गवर्णनाला नवकाव्यातला, जडात चैतन्य ओतण्याचा ध्यास आहे पण केवळ अनुकरणाचा पाश नाही. शांतारामाच्या आणि नवकथाकारांच्या कथात लेखकाचे आंतरिक व्यक्तित्व पुनःपुन्हा उफाळून वर येते आणि कुठल्याहि व्यक्तित्वाची उंची खोली अमर्याद नसल्यामुळे वाचकांचा जीवहि एका ठराविक सीमारेषेतच वरखाली होतो. या आपल्यातच विश्व पाहण्याने आर्तता–जिव्हाळा ओतप्रोत ओतला जातो, वेगळेपणा जाणवतो, पण एका ठराविक चक्रव्यूहात लेखक–वाचक गरगरत राहतात. आत्यंतिक आत्मनिष्ठा कथेला मारक होते व तीच तारकहि होते. वैचित्र्य कमी होते पण मनाचे पापुद्रे विलग होतात. लेखकाने व्यक्तित्व विराट करीत जाणे हाच एक यावर तोडगा.

'**खार**' या कथेतील कविवृत्तीतील अकारण उदासपणाचे चित्रण याच आत्मनिष्ठेतून साकारले आहे. खार कवीशी बोलते हे वनवासी फुलासारखेच काव्यरम्य वातावरण. आजच्या कथाकाराचे मन कविमनच असते. या अकारण उदासीनतेच्या कारणाचा थांग कुणी पहावा ? बालकवीसारखा निरागस मनाचा प्रांजळपणा या ठिकाणी आत्मनिष्ठेमुळेच मनाचा ठाव घेतो.

'**धूळ**' मधे प्रसंगाची मालिका गुंफली आहे, पण कथेचे आस्थाकेंद्र हवालदील पतितेच्यां घृणेभोवती घोटाळते. तिने गहिवरून पाय धरले म्हणजे मात्र त्या प्रतिष्ठित प्रवाशाचे शरीर शहारते. स्त्रीला ते उमगते नि शिष्टांच्या दांभिक घृणेची उबग येते. सोडवणुकीचा दीड रुपयाचा भरणा त्याच्या तुच्छतेच्या साहाय्यातून झाला असतांहि, ती गुंडांचे तेवढेसे ऋण फेडण्याकरता त्याच्याबरोबर हसत हसत कायमची निघून जाते. पण हे सांगतांना शांतारामाची सूचकता व मार्मिकता अजोड आहे. साध्या भोळचा वाचकाच्या हे ध्यानांतहि येऊ नये.

'**जुळवणी**' मधल्या स्त्रीपुरुषाच्या शरीरमीलनातच प्रेमिकांच्या अंतिम समाधानाची पंढरी गाठली आहे; या नाजुक निष्कर्षांत अश्लीलतेचा मागमूसहि नाही, पण उघडेनागडे सत्य मर्यादेने सूचित केले आहे.

'शिंगां'तला जनावराच्या मनाचा थांग पाहण्याचा प्रयत्न, एकाच्या गौरववस्तूचा दुसऱ्याला अडथळा व्हावा हा निष्कर्ष–एक टूम म्हणून हा कृत्रिम-

तेचा प्रयोग त्यांच्या हातून घडला का ? का चांद्याच्या जंगलात पाहिलेल्या सांबरांचे दर्शन घडवावेच हा मोह त्यांना अनावर झाला ?

'नशा' आणि 'नीति' या कथांची जातगोत एकच. एकच विदारक छटेचा रंग जास्त. जुवा खेळणारा चोरी करणाराला अनीतिमान ठरवतो. 'नीति'च्या पाठची 'नशा' ! सारे एक वर्षाचे अंतर. 'नीति' ला पिवळी करून तिची या पुस्तकातून रवानगी केली असती तर बरे झाले असते.

सौम्यता हा विशेष

सौम्यता हा शांतारामांचा विशेष. क्वचित पाल्हाळ डोकावला तरी त्यांचा संयम सुटायचा नाही. उत्कटता असूनहि भडकपणाचे त्यांना वावडे. खूब रडवणे, खूब हसवणे–भडकवणें हे त्यांच्या वृत्तीतच नाही. चिंतनशीलतेची हुरहूर आणि त्यातच मननातल्या मनाला लाभणारी एखादी आनंदाची झुळूक ! सौंदर्याकांक्षी मनाचे साक्षात्कार पण क्वचित् वर चढवलेला दिखाऊ साजशृंगार. 'शांत'[illegible] घडवलेले जीवनदर्शन आणि त्यांच्या मर्यादा या अशा आहेत. उगा[illegible] दिव्याचे दर्शन किंवा मानवतेच्या उत्तुंगतेकडे झेप असे काही मोठे मोठे त्यां[illegible] कथात नाही. सामान्य माणुसकीच्या काही छटांचे गूढरम्य दर्शन व आप[illegible] वेगवेगळ्या भाववृत्तींचे चित्रण हे त्यांच्या कथांचे स्वरुप. त्याची कक्षा ध्या[illegible] आल्यानंतर त्यांत हे नाही नि ते नाही अशी तक्रार प्रामाणिक वाचक क[illegible] करील ? 'शांतारामां'चे विशेष भाग्य म्हणजे त्यांची चाकोरी ठरलेली नाही. आणि म्हणूनच चाकोरींतून बाहेर पडण्याची धडपडहि त्यांच्या बाबतीत संभवत नाही. मर्यादा असल्या तरी त्यांची कला विकसित आणि स्वयंपूर्ण आहे.

卐

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य सम्मेलन, अधिवेशन २२ वे
सावरगाव (जि. बुलढाणा)

दि. १४–२–६० रोजी खुल्या अधिवेशनात

मंजूर झालेले ठराव

ठराव १—गतवर्षी पुढील साहित्यिक, संशोधक व कलावंत दिवंगत झाल्यामुळे भारताची व विशेषतः सर्व मराठी प्रदेशाची फार हानि झाली आहे. हे संमेलन त्यांच्या निधनाबद्दल अत्यंत दुःख व्यक्त करते आणि त्यांना आपली श्रद्धांजलि अर्पण करते.

(१) प्रा. गं. भा. निरंतर, पुणे, (२) डॉ. कालिदास मोरेश्वर पारखी, नागपूर, (३) डॉ. गो. स. सरदेसाई, कामशेत, (४) डॉ. अ. स. अळतेकर, पाटणा, (५) श्री. दत्तु बांदेकर, पुणे, (६) रेजिसॉर श्री. पार्श्वनाथ अळतेकर, कोल्हापूर, (७) श्री. चिंतामणराव कोल्हटकर, मुंबई.

(अध्यक्षांकडून)

ठराव २—मराठी लेखनाची सर्वसामान्य प्रमाणित आणि अधिकृत पद्धति तयार होण्याच्या दृष्टीने विदर्भ साहित्य संघाने १९५३ साली सुचविलेले नियम हळूहळू सर्व मराठी प्रदेशात मान्यता पावत आहेत, ह्याबद्दल ह्या संमेलनाला आनंद होत आहे. तथापि काही थोडया व्यक्तींकडून ह्या वास्तववादी व पुरोगामी नियमांना अनिष्ट प्रकारचा विरोध होत आहे. ह्याबद्दल ह्या संमेलनास खेद वाटतो. तरी सर्व साहित्य संस्था, विद्यापीठे, मुद्रणसंस्था, शासनसंस्था, लेखक व प्रकाशक ह्यांनी विदर्भ साहित्य संघाने सुचविलेल्या नियमांचा अंगीकार व पुरस्कार करावा, अशी ह्या संमेलनाची त्यांना कळकळीची विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

ठराव ३—इंग्रजी अमदानीत व तत्पूर्वी कित्येक गावांची जुनी ऐतिहासिक नावे विकृत झाली होती किंवा बदलली होती. राष्ट्रीय जागृतीच्या दृष्टीने

इतिहास, संस्कृति, राजकीय घडामोडी, पौराणिकता इत्यादींशी निगडीत असलेली नावे त्या त्या गावांना पुन्हा देण्याची पद्धति भारत शासनाने सुरू केली आहे, ह्याबद्दल हे संमेलन भारत शासनाचे अभिनंदन करते व ह्याच दृष्टीने विदर्भातील वाशीम, चांदा इत्यादि गावांना त्यांची इतिहास व संस्कृतीशी निगडीत असलेली अनुक्रमे वत्सगुल्म, चंद्रपूर ही नावे देण्यात यावीत अशी राज्य व भारत शासनास विनंती करते.

(अध्यक्षांकडून)

ठराव ४—समाजाच्या आजच्या परिस्थितीत संस्कृति, कला, साहित्य व शिक्षण यांच्या बरोबरच मानवतेच्या उदात्त जीवनमूल्यांची प्रस्थापना करण्याची नितान्त गरज आहे. त्यासाठी आवश्यक ते वातावरण निर्माण करण्यासाठी भारतात एका नव्या विशाल, स्वतंत्र व सर्व पक्षभेदापासून अलिप्त असे सांस्कृतिक व्यासपीठ निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे या संमेलनाचे मत आहे. यासाठी सर्व मराठी प्रदेशातील साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांनी एकमेकांच्या सहकार्याने हे कार्य हाती घ्यावे, असे आवाहन हे संमेलन सर्वांना करीत आहे.

(अध्यक्षांकडून)

ठराव ५—गेल्या दोन संमेलनांमधून विदर्भ साहित्य संघाने रामटेक येथे महाकवि कालिदासाचे, पद्मपूर येथे महाकवि भवभूतीचे व आंभोरा येथे आद्य मराठी कवि मुकुंदराज यांचे स्मारक उभारावे, अशी मागणी शासनाकडे केलेली आहे. महाकवि कालिदासाच्या स्मारकाची योजना, माजी न्या. मू. श्री. भवानी-शंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या समितीने शासनास सादर केली आहे, असे समजते. सरकारने त्या समितीच्या प्रतिवृत्तावर आवश्यक ती कार्यवाही करून स्मारक उभारण्याचे कार्य अविलंबे सुरू करावे, अशी हे संमेलन सरकारला आग्रहाची विनंती करते. त्याचप्रमाणे या संमेलनाने यापूर्वीच पद्मपूर येथे महाकवि भवभूति व आंभोरा येथे आद्य मराठी कवि मुकुंदराज यांची स्मारके उभारावीत अशी जी मागणी शासनाकडे केली आहे त्याकडे शासनाचे पुन्हा लक्ष वेधते व कालिदास स्मारकाप्रमाणे ही दोन स्मारके उभारावीत अशी आग्रहाची विनंती करते.

सूचक—प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, खामगाव

अनुमोदक—प्रा. सुरेश म. डोळके, नागपूर

ठराव ६—जुन्या मध्यप्रदेश शासनाने सुरू केलेली "शासन साहित्य-परिषद्" ही अत्यंत उपयुक्त संस्था नवीन मुंबई राज्यातहि चालू ठेवावी

अनुक्रमणिका

ग्रंथप्रकाशनाचे अपुरे राहिलेले परिषदेचे कार्य मुंबई शासनाने पूर्ण करावे, अशी विनंती गेल्या तीन संमेलनांमधून शासनास करण्यात येत आहे. तथापि यासंबंधी अजून कोणतीहि कार्यवाही करण्यात आली नाही, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. तेव्हा या संबंधीची कार्यवाही मुंबई शासनाने त्वरित हाती घ्यावी अशी ह्या संमेलनाची मागणी आहे.

सूचक—डॉ. द. ह. अग्निहोत्री, पुलगाव   अनुमोदक—श्री. य. गो. मालोदे, नागपूर

ठराव ७—मुंबई शासनाच्या पुराणवस्तु खात्याची राजकोट, औरंगाबाद इत्यादि ठिकाणी स्वतंत्र विभागीय कार्यालये उघडण्यात आली आहेत. अशा प्रकारचे विदर्भातहि स्वतंत्र विभागीय कार्यालय उघडण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तरी या दिशेने मुंबई शासनाने कार्यवाही करावी व उत्खननाच्या व संशोधनाच्या कार्यास चालना द्यावी, अशी हे संमेलन मुंबई शासनास पुन्हा विनंती करते.

सूचक—प्रा. दा. ल. अडोणी, सागर.   अनुमोदक—श्री. वा. पु. मोहरीर, वर्धा

ठराव ८—हे संमेलन मुंबई राज्य सरकारला अशी विनंती करते की ग्रंथालयांचा प्रसार त्वरित होण्यासाठी त्यांनी संपूर्ण राज्यासाठी ग्रंथालयविषयक कायदा करून तो शक्य तितक्या लवकर अमलात आणावा.

सूचक—प्रा. भा. ल. भांबूरकर, नागपूर   अनुमोदक—श्री. अ. ल. लिमये, नागपूर

ठराव ९—राज्यपुनर्रचनेचे वेळी मराठी भाषी विभाग मुंबई राज्यांत एकत्रित आणताना बऱ्हाणपूर, भैंसदेही, मुलताई, सौंसर, बालाघाट, वाराशिवणी आणि बस्तर व बैतुल जिल्ह्यातील मराठी भाषी प्रदेश हे विदर्भाशी संलग्न असलेले विभाग, तसेच जुन्या हैद्राबाद राज्यातील शिरपूर, आदिलाबाद, उटणूर, बिदर इत्यादि मराठीभाषी विभाग आणि जुन्या मुंबई राज्यातील बेळगाव, कारवार आदि मराठीभाषी विभाग नवीन मुंबई राज्यास जोडण्यात आले नाहीत. हे सर्व प्रदेश नवीन मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात यावेत, अशी हे संमेलन संघ व राज्यशासनांना पुन्हा आग्रहाची विनंती करते.

सूचक—श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, नागपूर   अनुमोदक—श्री. य. गो. मालोदे, नागपूर.

अनुक्रमणिका

ठराव १०—विदर्भातील हळबी, कोरकू, कोलाम, वंजारी, लभानी, भिल्ल, पारधी, गोंड इत्यादि लोकभाषांच्या व त्यातील लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना देण्यासाठी विदर्भाकरिता लोकसाहित्य समिति स्थापन करण्याचा मुंबई शासनाचा निर्णय त्वरित कार्यान्वित करण्यात यावा व विदर्भातील साहित्यसंस्था व साहित्यिक यांच्या मदतीने हे महत्त्वाचे कार्य शासनाने सुरू करावे, अशी ह्या संमेलनाची मुंबई शासनास विनंती आहे.

सूचक–प्रा. सु. म. डोळके, नागपूर   अनुमोदक–श्री. संतोषराव पाटील, सावरगाव

ठराव ११—मराठीचे सुप्रसिद्ध नाटककार, कवि व विनोदी लेखक कै. राम गणेश गडकरी यांचे निधन नागपूर जिल्ह्यातील सावनेर गावी ज्या घरामध्ये झाले ते घर राष्ट्रीय स्मारक म्हणून मुंबई शासनाने ताब्यात घ्यावे व त्या ठिकाणी आणि सावनेर येथील त्यांच्या दहनभूमीवर कै. गडकरी यांचे सुयोग्य स्मारक उभारण्यात यावे, अशी या संमेलनाची मुंबई शासनास आग्रहाची सूचना आहे.

वरीलप्रमाणेच पुणे येथील कसबा पेठेतील ज्या घरात कै. गडकरी यांचे वास्तव्य होते ते घरहि राष्ट्रीय स्मारक म्हणून ताब्यात घेऊन त्या ठिकाणी कै. गडकरी यांचे सुयोग्य स्मारक उभारले जावे, अशी या संमेलनाची मुंबई शासनास सूचना आहे.

सूचक—श्री. यादवराव उपाध्ये, सावनेर   अनुमोदक—श्री. गो. स. देहाडराय, नागपूर

卐

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस वि. सा. संघ, याजकडून

२२ वे विदर्भ साहित्य संमेलन, सावरगाव (डुकरे)

कार्यक्रमांचा अहवाल

शनिवार दि. १३–२–६० ला २२ व्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अधिवेशनाला सावरगाव (जिल्हा बुलढाणा) ह्या आदर्श गावी अत्यंत थाटाने सुरवात झाली. गावाच्या मध्यभागी संमेलनासाठी भव्य मंडप उभारलेला होता; व त्याकडे जाणारा रस्ता कमानी व पताकांनी शृंगारलेला होता. परगांवाहून यंत्र आणून सर्वत्र विजेची रोषणाई केली होती.

शनिवारी दुपारी १॥ वाजेपर्यंत नागपूर, अमरावती, चांदा, वर्धा, खामगाव, वाशीम, भंडारा, अकोला, पुलगाव, मेहेकर, चिखली इ. गावांवरून सुमारे २५० प्रतिनिधि व स्वागत सदस्य संमेलनासाठी येऊन पोचले.

दुपारी ३ वाजता ऐतिहासिक, साहित्यिक व कलात्मक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. मंडपाचे शेजारी असलेल्या सुभाष वाचनालयाच्या दालनात प्रदर्शनाचे सुबक रीतीनें आयोजन करण्यात आले होते. विदर्भातील लहानथोर अदमासे १०० लेखकांचे ग्रंथ प्रदर्शनात मांडण्यात आले होते. हिंदुस्थानचे नकाशे काढून त्यात निरनिराळया भागातील खेडुतांचे पेहेराव दाखविले होते, तसेच ठिकठिकाणी कोणत्या जातीचे शेतीला उपयुक्त गोवंश आढळतात ह्यांची चित्रे ठेवली होती. प्रदर्शनाची व्यवस्था राजाराम वाचनालयाच्या तर्फे करण्यात आली होती. तसेच नागपूरचे श्री. मनोहर व श्री. पारळकर यांच्या चित्रकलाकृतींनी प्रदर्शनाला उठाव आणला होता. प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी प्रथम वि. सा. संघाचे चिटणीस प्रा. भा. ल. भांबूरकर यांनी प्रदर्शनाची माहिती सांगितली. त्यानंतर श्री. य. गो. मालोदे यांनी उद्घाटक श्री. शं. गो. तथा अण्णासाहेब डवीर यांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. त्यानंतर श्री. डवीर यांनी फुलवात उजळून


प्रदर्शनाचे उद्घाटन केले, व आपल्या भाषणात संशोधनकार्याचे महत्त्व विशद केले.

दुपारी ४ वाजता प्रतिनिधि निवासात केन्द्रीय कार्यकारी मंडळाची सभा झाली.

सायंकाळी ठीक ५ वाजता संमेलनाच्या उद्घाटनाला सुरवात झाली. मंडपाकडे जाणाऱ्या वाटेवर स्वयंसेवकांची पथके मानवंदना देण्यासाठी हातात काठ्या घेऊन दुतर्फा उभी होती. मंडपाजवळ दोन्ही बाजूंना हातात आरतीची व फुलांची तबके घेऊन सुमारे ५० सुवासिनी ओळीने उभ्या होत्या. अत्यंत भावपूर्ण व विलोभनीय असे हे दृश्य होते. संमेलनाचे उद्घाटक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण हे ठीक वेळेवर सावरगाव येथे येऊन पोचले. मुख्य कमानीपाशी त्यांचे स्वागत करण्यात आले व तेथून स्वयंसेवकांची मानवंदना व सुवासिनींची ओवाळणी घेत घेत संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व उद्घाटक मा. यशवंतराव चव्हाण मंडपापाशी आले. रस्त्याने त्यांचेवर फुले उधळली जात होती. ह्याच वेळी बंदुकीच्या बारांनी त्यांचे स्वागत करण्यांत आले. "आज देवनगरीत आल्यासारखा भास मला होत आहे" असे प्रसन्न उद्गार श्री. चव्हाण यांनी ह्यावेळी काढले.

मंडपात आल्यावर श्री. चव्हाण व श्री. शेंडे यांनी प्रदर्शनास भेट दिली व त्यानंतर ते व्यासपीठावर आले. त्यांचेबरोबर व्यासपीठावर वि. सा. संघाचे कार्यकारी विश्वस्त श्री. के. तु. मंगळमूर्ति, उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, पूर्वाध्यक्ष व युगवाणीचे संपादक श्री. पु. य. देशपांडे, स्वागताध्यक्ष श्री. संतोषराव पाटील, सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर, स्वागत सरचिटणीस श्री. सखारामपंत पाटील, कलेक्टर श्री. देसाई, डॉ. गोपाळराव खेडकर, श्री. घारफळकर, सौ. इंदिराबाई कोटमकर, श्री. शं. गो. डबीर, पूर्वाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. मा. ज. कानेटकर, श्री. पंढरीनाथ पाटील, श्री. म. सी. मुंडले आदि कार्यकर्ते बसलेले होते. सुरवातीला कु. दुर्गा कानगो यांनी महाराष्ट्र-गीत गायिल्यावर स्वागताध्यक्ष श्री. संतोषराव पाटील यांनी स्वागतपर भाषण केले. (हे भाषण गेल्या अंकात दिले आहे.) नंतर उद्घाटक श्री. चव्हाण यांचा निरनिराळ्या संस्थांतर्फे हार घालून सत्कार करण्यात आला; व त्यांनंतर श्री. चव्हाण यांचे उद्घाटनपर भाषण झाले. मराठी भाषा आता लवकरच राजसिंहासनावर बसणार अशा ह्या महत्त्वाच्या वेळी त्यांनी अखिल मराठी जनतेला उद्देशून कळकळीचे आवाहन केले व विदर्भ साहित्य संघाच्या कार्याची प्रशंसा केली. उद्घाटन झाल्यावर संमेलनाच्या कार्यक्रमास संदेशवाचनाने सुरवात झाली. वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो.

काशीकर यांनी देशाच्या निरनिराळ्या भागातून आलेले सुमारे ५०–६० संदेश संक्षेपाने वाचून दाखविले. त्यानंतर श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संमेलनाध्यक्ष-पदाचा प्रस्ताव मांडला. त्याला प्रा. पद्माकर डावरे, श्री. द. रा. गोमकाळे,



माननीय श्री. यशवंतराव चव्हाण उद्घाटनाचे भाषण करीत असताना. व्यासपीठावर––श्री. पु. य. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. बाळासाहेब ढवळे व संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे.

डॉ. द. ह. अग्निहोत्री व प्रा. तु. वि. गेडाम यांनी अनुमोदन दिले. ह्यावर टाळ्यांच्या कडकडाटात श्री. ना. रा. शेंडे हे संमेलनाध्यक्ष म्हणून स्थानापन्न झाले. ह्यावेळी निरनिराळ्या संस्थांतर्फे हार घालून त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. कृ. मु. उजळंबकर यांनी आपल्या कवितांचें पुस्तक अर्पण करून व नागपूरचे छायाचित्रकार श्री. मधुकर पारळकर यांनी श्री. शेंडे यांचे सुबक छायाचित्र भेट देऊन त्यांचा सत्कार केला.

यानंतर श्री. शेंडे यांनी सर्व सभाजनांना मानाचा मुजरा करून सद्गदित कंठाने आपले ३३ पानी भाषण वाचून दाखविले. (हे भाषण गेल्या अंकात पूर्णपणे दिले आहे.)

अध्यक्षीय भाषणानंतर श्री. पु. य. देशपांडे यांनी अत्यंत मार्मिक शब्दात श्री. चव्हाण यांचेबद्दल विदर्भातील जनतेच्या भावना व्यक्त केल्या व सर्वांचे आभार मानले.

शेवटी कु. दुर्गा कानगो यांनी 'वंदे मातरम्' म्हटल्यावर अधिवेशनाची पहिली बैठक संपली.

त्यानंतर निवासस्थानाच्या मंडपात मुख्यमंत्री श्री. चव्हाण, श्री. ना. रा. शेंडे व प्रतिनिधि आणि कार्यकर्ते यांना थाटाचा अल्पोपाहार देण्यात आला.

रात्री ठीक ९–१५ वाजता अधिवेशनाच्या सभामंडपात श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलनाला सुरवात झाली. कविसंमेलनाचा हा कार्यक्रम अत्यंत रोचक आणि आकर्षक झाला. यात संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, प्रा. पद्माकर डावरे, श्री. बाबा मोहोड, श्री. मधु पारळकर, कु. दुर्गा कानगो, श्री. व्यं. व. पुराणिक, श्री. कृ. मु. उजळंबकर, श्री. वि. बा. जोशी, श्री. रा. ना. पांडे, श्री. प्रभाकर उघडे, श्री. वा. के. अत्रे, कु. सुगंधा शेंडे, प्रा. भी. रा. जहागिरदार, प्रा. भाऊ मांडवकर, श्री. शे. सु. जैन, श्री. न. रा. निमजे, श्री. द. ज. बर्गी, प्रा. भालेराव, प्रा. दा. ल. अडोणी, श्री. जा. गो. खडसे, श्री. ग. श. मोरे व श्री. रा. रा. सीताफळे ह्या कवींनी भाग घेतला. ह्यानंतर बुलढाणा येथील कलापथकाचा अत्यंत बहारदार कार्यक्रम झाला. शेवटी जानेफळ येथील कलावंतांनी दंढार नावाचा अभिनव आध्यात्मिक पार्श्वभूमीवर आधारलेला कार्यक्रम सादर केला.

पुस्तक प्रकाशन

रविवार दि. १४–२–६० च्या कार्यक्रमांची सुरवात सकाळी ९ वाजता प्रा. पद्माकर डावरे लिखित 'नाना फडणवीस! दादा! भाई! नवरोजी!!' ह्या एकांकिका संग्रहाच्या प्रकाशनाने झाली. सुरवातीला प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी ग्रंथाचा व ग्रंथकर्त्याचा परिचय करून दिला. त्यानंतर संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी ग्रंथाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर केले. व प्रा. डावरे यांच्या साहित्यगुणांची प्रशंसा केली.

बोलभाषांवरील परिसंवाद

त्यानंतर सकाळी ९–३० वा. 'मराठी आणि तिच्या वैदर्भीय बोलभाषा' ह्या विषयावरील परिसंवाद सुरू झाला. वऱ्हाडी, नागपुरी, गोंडी, कोरकू, हळबी इ. उपेक्षित बोलभाषांच्या अध्ययनाला चालना देण्याचे फार मोठे कार्य ह्या

अनुक्रमणिका

परिसंवादाने घडून आले. खेड्यात भरणाऱ्या संमेलनात परिसंवादाकरिता बोलभाषांचा विषय निवडण्यात विशेष औचित्यहि दिसून आले. ह्या परिसंवादात श्री. सोमण वकील, बुलढाणा, यांचे वऱ्हाडीबद्दल; प्रा. सुरेश डोळके, नागपूर, यांचे नागपुरी व हळबी भाषांबद्दल; श्री. वि. वा. जोशी, चांदा, यांचे गोंडी भाषेबद्दल; श्री. द. वा. प्रधान, शिक्षणाधिकारी, अमरावती, यांचे कोरकू भाषेवर; प्रा. दा. ल. अडोणी, सागर विद्यापीठ, सागर, यांचे बुंदेलखंडीवर व प्रा. जहागिरदार, खामगाव, यांचे अहिराणी भाषेवर अशी विद्वत्तापूर्ण भाषणे झाली. ह्याशिवाय खामगावचे प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी 'भाषा व बोली' ह्या विषयावर व पुलगावचे डॉ. द. ह. अग्निहोत्री यांनी 'बोलभाषांचे व्युत्पत्तिशास्त्र' यावर उद्बोधक भाषणे केली. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीहि या परिसंवादात भाग घेतला व वैदर्भीय आणि कोकणी बोली यांच्यातील काही साम्ये दर्शविणारे व्यासंगपूर्ण भाषण केले.

खेडुत श्रोत्यांनाहि गोडी वाटली

परिसंवादातील सर्वच वक्त्यांनी अभ्यासपूर्वक भाषणे केली. बहुतेकांनी आपलीआपली लेखी तयार केली होती, हे विशेष होय. मराठीशी निरनिराळ्या बोलींचा नक्की संबंध कसा आहे, प्रत्येक बोलभाषेचे वैशिष्टय काय आणि त्या बोलींतून मराठीमध्ये घेण्यासारखे शब्द, वाक्प्रचार कोणते ह्या दृष्टीने हा परिसंवाद अत्यंत उद्बोधक झाला. खेड्यातील लोकांच्या भाषेसंबंधीचे विवेचन त्यात असल्यामुळे साहित्यिक प्रतिनिधींच्या बरोबरच खेड्यातील जनताहि परिसंवाद उत्सुकतेने ऐकत होती. तब्बल तीन तास हा कार्यक्रम चालला. तथापि शेवटपर्यंत श्रोते भरपूर संख्येत उपस्थित होते.


दुपारी जेवणाचे वेळी सर्व प्रतिनिधींचा व स्वागतमंडळाच्या सदस्यांचा परस्परांचा परिचय करून देण्यात आला.

अंदाजपत्रकाला मान्यता

त्या नंतर दुपारी १ वा. विषयनियामक समितीची सभा माध्यमिक शाळेच्या अध्यक्षीय दालनात सुरू झाली. ह्या सभेमध्ये खुल्या अधिवेशनात मांडावयाचे ठराव व त्यावर बोलणाऱ्या वक्त्यांची नावे निश्चित करण्यात आली.

त्याच ठिकाणी दुपारी २ वाजता विदर्भ साहित्य संघाच्या साधारण सभेची बैठक श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

ज्येष्ठ समाजसेवकांचा सत्कार दि. १४-२-१९६०



श्री. मा. ज. कानेटकर, श्री. म. सी. मं ... ा. डवीर, श्री. पन्नालाल व्यास, श्री. पंढरीनाथ पाटील,
श्री. ना. रा. शेंडे, (संमेलनाध्यक्ष) प्रा. ... कर, (सरचिटणीस) व श्री. बाळासाहेब ढवळे (उपाध्यक्ष)

माननीय ज्येष्ठांचा सत्कार

सायंकाळी ४ वा. अधिवेशनाच्या मंडपात विदर्भातील काही वयोवृद्ध, ध्येयनिष्ठ व त्यागी कार्यकर्त्यांच्या सत्काराचा अत्यंत रोचक व भावपूर्ण कार्यक्रम सुरू झाला. सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून या सत्काराचा हेतु व स्वरूप स्पष्ट केले. ह्या सत्काराचे वैशिष्टच म्हणजे, ज्यांना सत्कार आवडत नाही व सत्ता, संपत्ति, कीर्ति यापैकी कशाचीहि हाव न धरता जे स्वार्थनिरपेक्ष बुद्धीने, जनसेवेच्या खऱ्या तळमळीने समाजकार्य करीत आले व ज्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयाकरिता आपले जीवित अर्पण केले, त्यांचा हा सत्कार होता. सत्काराच्या मानकऱ्यांमध्ये आर्यसमाजी व हिंदु महासभेच्या विचाराचे श्री. पन्नालालजी व्यास, खामगाव, सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्षाचे श्री. पंढरीनाथ पाटील, चिखली, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. शं. गो. डवीर, वाशीम, काँग्रेसचे व विशेषतः सर्वोदयवादी विचाराचे श्री. मा. ज. कानेटकर, नागपूर व निःपक्ष वृत्तीचे हरिजनसेवक श्री. म. सी. मुंडले, मोर्शी असे भिन्न भिन्न विचारांचे व प्रवृत्तीचे वृद्ध कार्यकर्ते विदर्भ साहित्य संघाच्या व्यासपीठावर एकत्रित झाले, यात विदर्भ साहित्य संघाचाहि फार मोठा गौरव झाला असे म्हटले पाहिजे. विदर्भ साहित्य संघाच्या जातिपक्षनिरपेक्ष धोरणाची यात प्रचीति येते एवढेच नव्हे, तर संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांस्कृतिक व्यासपीठाच्या ज्या भव्य व उदात्त कल्पनेचा पुरस्कार केला, त्या सांस्कृतिक व्यासपीठाची मुहूर्तमेढ ह्या सत्काराच्या प्रसंगी त्यांच्याच हाताने रोवली गेली, असे म्हणावयास हरकत नाही. ह्या सत्काराचे स्वरूप प्रतीकात्मक होते हेहि लक्षात ठेवले पाहिजे.

माननीयांचा आशीर्वाद आणि अपेक्षा

प्रास्ताविक भाषणानंतर सरचिटणीस प्रा. काशीकर यांनी प्रत्येक मानकऱ्याच्या समाजसेवेचा व साहित्यसेवेचा परिचय करून दिला; व त्यानंतर संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या हस्ते ज्येष्ठत्वाच्या क्रमानुसार प्रत्येकाला शाल, श्रीफल व पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आले. त्यानंतर श्री. ना. रा. शेंडे यांनी सर्वांच्या सत्काराचे भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी प्रत्येक मानकऱ्याच्या जीवनकार्याचा अत्यंत गौरवपर शब्दांत आढावा घेतला; व प्रत्येकाला आशीर्वाद देण्यास विनंती केली. यानंतर सर्व वृद्ध मानकऱ्यांची आशीर्वादपर भाषणे झाली. श्री. पन्नालालजी व्यास यांनी, संघकार्याची प्रशंसा करून, सर्वेऽपि सुखिनः सन्तु अशा शब्दात आशीर्वाद दिला. श्री. शं. गो. डवीर यांनी हिंदु

धर्माचे उज्ज्वल स्वरूप अधिक उज्ज्वल व्हावे व शिवाजीमहाराजाचा आदर्श सर्वांनी आपल्यासमोर ठेवावा, अशी आकांक्षा व्यक्त केली. श्री. मा. ज. कानेटकर यांनी आपल्या शैलीदार भाषेत सांगितले की, " स्वतःकडून समाजाचे हित न झाले, तरी आपल्या आचरणाने समाजाचे अनहित होणार नाही, याची मी सदैव काळजी वाहत आलो आहे; व कमीत कमी एवढी तरी काळजी प्रत्येकाने वाहावी ही माझी अपेक्षा आहे." 'गीताप्रणीत व्यवहारशास्त्र' ह्या ग्रंथाचे लेखक श्री. म. सी. मुंडले यांचा तर भाषण करताना कंठ दाटून आला; व सद्गदितपणे त्यांनी घोषणा केली की, " ह्यापुढे मी सध्याचे कपडे सोडून खादीचे कपडे धारण करणार आहे; व एक प्रकारचा वानप्रस्थाश्रम स्वीकारून हरिजन-सेवेच्या कार्याला स्वतःला पूर्णपणे वाहून घेणार आहे." श्री. पंढरीनाथ पाटील यांनी आपल्या भाषणातून बहुजनसमाजाच्या हिताची कळकळ व्यक्त केली; व बहुजनसमाजाचे हितकर्ते महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे अधिक परिशीलन करण्यात येऊन सरस्वतीच्या मंदिरात त्यांना मानाचे स्थान देण्यात यावे, असे आवाहन केले. शेवटी उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी सर्वांचे आभार मानल्यावर हा उदात्ततेचे दर्शन घडविणारा कार्यक्रम समाप्त झाला.

अधिवेशनातील महत्वाचे ठराव

या कार्यक्रमानंतर लगेच खुल्या अधिवेशनाला सुरवात झाली. खुल्या अधिवेशनात एकूण ११ महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. (हे सर्व ठराव ह्याच अंकात इतरत्र पूर्णपणे दिले आहेत.) सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. ह्या ठरावांवर प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. सुरेश डोळके, डॉ. द. ह. अग्निहोत्री, श्री. य. गो. मालोदे, प्रा. दा. ल. अडोणी, श्री. वा. पू. मोहरीर, प्रा. भा. ल. भांबूरकर, श्री. अ. ल. लिमये, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. संतोषराव पाटील, श्री. यादवराव उपाध्ये व श्री. गो. स. देहाडराय यांनी भाषणे केली.

समारोप

अशा रीतीने अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात खुल्या अधिवेशनाचे कार्य संपल्यावर समारोपाचा कार्यक्रम सुरू झाला. सर्वप्रथम संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी सर्वांचे आभार मानले. विशेषतः मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व स्वागताध्यक्ष श्री. संतोषराव पाटील यांचा त्यांनी गौरवपर उल्लेख केला; तसेच खेड्यातील जनता किती सुसंस्कृत असते ह्याची प्रचीति ह्या संमेलनाने आणून दिली आहे अशा शब्दात गावकऱ्यांचा गौरव केला. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री.

ंतोषराव पाटील व सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सर्वांचे आभार ानले. प्रतिनिधींच्या वतीने प्रा. जहागिरदार यांनी आभार मानल्यावर कु. दुर्गा ानगो यांच्या 'जनगणमन' ह्या राष्ट्रगीताने समारोपाचा कार्यक्रम संपला.

त्यानंतर सर्व प्रतिनिधींना बुंदीची उत्कृष्ट मेजवानी देण्यात आली.

सुंदर नाट्यप्रयोग

रात्री ९–३० वाजता चिखली येथील नगरपालिका विद्यालयाचे प्रांगणात वि. सा. संघाच्या खामगाव शाखेच्या वतीने श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'भाग्यवान" ह्या सामाजिक नाटकाचा यशस्वी प्रयोग करण्यात आला. ह्या प्रयोगाचे दिग्दर्शन डॉ. बाबुराव पारसनीस यांनी केले होते; व नाटकाची सर्व व्यवस्था चिखली येथील ललित कलामंडळाने उत्कृष्ट ठेवली होती. नाटकातील भूमिका डॉ. पारसनीस (शिदबा), प्रा. वि. ए. तारे (संभा), श्री. शशिकांत देशपांडे (श्रीपत), सौ. स्मिता देशपांडे (सरस्वती), प्रा. श्री. धों. जोगळेकर (डॉक्टर), प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे (काळे), कु. सुलभा गुप्ते (लता), व श्री. विश्वासराव देशमुख (इसम) यांनी उत्कृष्टपणे वठविल्या. नाटकाचा प्रयोग सुंदर झाला.

आदर्श खेड्याचा प्रेमळ पाहुणचार

अशा रीतीने हे संमेलन अत्यंत यशस्वीपणे व उत्साहाच्या वातावरणात पार पडले. सावरगाव येथील प्रत्येक मनुष्य ह्या संमेलनासाठी मनःपूर्वक झटत होता. गाव लहान असूनहि प्रतिनिधींची सर्व व्यवस्था उत्तम ठेवण्यात आली होती. स्वागताध्यक्ष श्री. संतोषराव पाटील व इतर सर्व कार्यकर्ते स्वतः जातीने सर्व व्यवस्था पहात होते.

हे संमेलन यशस्वी करण्याकरिता असंख्य लोकांचे आम्हाला साहाय्य झाले आहे. त्या सर्वांचे व्यक्तिशः आभार मानणे अशक्य असल्यामुळे याठिकाणी आम्ही सर्वांचे जाहीरपणे आभार मानीत आहोत.

उद्घाटक मुख्यमंत्री श्री. चव्हाण, संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, स्वागत मंडळातील सर्व कार्यकर्ते, देणगीदार, प्रदर्शनाची सुबक रचना करणारे श्री. डी. के. मनोहर, श्री. मधुकर पारळकर व राजाराम वाचनालय, कविसंमेलनात भाग घेणारे सर्व लहानथोर कवी, परिसंवादात भाग घेणारे विद्वान वक्ते, सत्कारसमारंभात भाग घेऊन संघाचा गौरव करणारे सन्मानाचे सर्व मानकरी, खुल्या अधिवेशनात ठरावावर भाषणे करणारे सर्व

अनुक्रमणिका

वक्ते, मनोरंजक कार्यक्रमात भाग घेणारे बुलढाणा येथील कलापथक, जानेफळ येथील दंढार व "भाग्यवान" नाटकाचे कलावंत, कार्यक्रमांना प्रसिद्धि देणारे सर्व वृत्तपत्रप्रतिनिधि, सर्व वृत्तपत्रे व वृत्तसंस्था, नागपूर आकाशवाणी, शासकीय चलत्‌चित्र विभाग, समाज कल्याण विभाग, शिक्षण विभाग, प्रसिद्धि –सूचनाविभाग, केंद्रीय ग्रंथालय इत्यादि सर्वांचे आम्ही आभारी आहोत. तसेच संमेलनाचे यश बुलढाणा जिल्ह्यातील नागरिक व सावरगावची जनता यांच्या कर्तृत्वावर अवलंबून असल्यामुळे त्यांचेहि आम्ही आभारी आहोत.

* *

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. १३–२–६० रोजी साहित्य संमेलन प्रसंगी सावरगाव डुकरे येथे संघाध्यक्ष श्री. ना. ना. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली भरली. सभेत पुढील कार्यवाही झाली.

१. मागील सभेचा अहवाल मंजूर करण्यात आला.

२. नऊमाही आर्थिक वृत्त मंजूर करण्यात आले.

३. मराठी नाट्यपरिषदेचे आगामी अधिवेशन नागपूर येथे बोलाविण्या-बद्दल कार्यकारी मंडळाने संमति दिली.

४. सावनेर शाखेच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली.

५. सभासदत्वाकरिता आलेल्या आवेदनपत्रांना मंजुरी देण्यांत आली.

६. संमेलनात मांडावयाच्या ठरावासंबंधी विचारविनिमय करण्यात आला.

सर्वसाधारण सभा

साहित्य संमेलनप्रसंगी सावरगाव डुकरे येथे दि. १४–२–६० रोजी दुपारी २–४५ ला सर्वसाधारण सभा संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली. सभेत पुढील कार्यवाही करण्यात आली.

१. मागील सभेचा अहवाल सभेपुढे वाचून दाखविण्यात आला. तो सर्वानु-मते मंजूर करण्यात आला.

२. सभेपुढे अनुपूरक अंदाजपत्रक सरचिटणीस श्री. श्री. गो. काशीकर यांनी सादर केले व त्यात किरकोळ दुरुस्त्या होऊन जमेकडे रु. ११६५०–०० व खर्चाकडे रु. १२३६५–०० चे अनुपूरक अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.

* *

भेटी व सत्कार

तुळजापूर येथील उस्मानाबाद जिल्हा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. भगवंतराव देशमुख यांनी दि. ३-१-६० रोजी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. या वेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, चिटणीस श्री. य. गो. मालोदे, श्री. गो. स. देहाडराय आदि कार्यकारी मंडळातील सभासद उपस्थित होते.

श्रीमती बकुळाबाई अभ्यंकर, पुणे यांनी दि. १०-१-६० रोजी वि. सा संघाला भेट दिली. संघाच्या कार्याची प्रगति होत असलेली पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

श्री. भा. वि. ऊर्फ मामासाहेब वरेरकर यांनी दि. १३-१-६० ला वि. सा. संघ आणि धनवटे रंगमंदिराला भेट दिली. याच प्रसंगी रंगमंदिरात त्यांचे "भारतीय रंगभूमि" या विषयावर उद्बोधक व्याख्यान झाले.

पंजाब राज्याचे राज्यपाल माननीय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी दि. २० -१-६० रोजी सायं. ६-३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली. या वेळी त्यांनी साहित्यमंदिर आणि रंगमंदिराची पाहणी केली. तदनंतर अल्पोपहाराचा कार्यक्रम झाला. माननीय राज्यपालांनी वि. सा. संघाच्या कार्याविषयी गौरवपर उद्गार काढले.

शनिवार दिनांक २०-२-१९६० रोजी सायंकाळी ७-३० वाजता मुंबई राज्याच्या शिक्षण खात्याचे संचालक डॉ. आ. ग. पवार यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, पूर्वाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. श्री. गो. काशीकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि उपस्थित कार्यकर्त्यांचा परिचय करून दिल्यानंतर उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे व रंगमंदिर समितीचे आमंत्रक श्री. बाबुराव चिमोटे यांनी सन्माननीय पाहुण्यांना विदर्भ साहित्य संघाचे धनवटे रंगमंदिर आणि विदर्भ साहित्य मंदिरातील निरनिराळे विभाग दाखविले. म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी विदर्भ संशोधन मंडळाचे दालन दाखवून मंडळाच्या कार्याची माहिती दिली.

संघाच्या गडकरी स्मारक सभागृहात सन्माननीय पाहुण्यांना अल्पोपहार देण्यात आला. ह्यावेळी श्री. ना. रा. शेंडे व डॉ. पवार यांची भाषणे झाली.

दि. २४-२-६० रोजी श्री. संतोषराव पाटील, स्वागताध्यक्ष, २२ वे साहित्य संमेलन सावरगाव (डुकरे) यांचा आणि महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक-मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्री. वि. द. घाटे यांचा वि. सा. संघातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी साहित्य मंदिर व

धनवटे रंगमंदिर पाहून आनंद व्यक्त केला. यावेळी अल्पोपाहाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दि. २६-२-६० रोजी खासदार म. म. पां. वा. काणे यांनी वि. सा. संघास भेट दिली व धनवटे रंगमंदिर पाहून आनंद व्यक्त केला. ह्याचवेळी त्यांचेबरोबर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति श्री. पटवर्धन यांनीहि भेट दिली.

* *

दुसरी कै. प्रा. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला--

दि. १७, १८ आणि १९ जानेवारी १९६० रोजी वि. सा. संघाचे वतीने २ री कै. प्रा. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला धनवटे रंगमंदिरात आयोजित आली. या व्याख्यान मालेत यावर्षी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध [illegible]त्यिक आणि तत्त्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी "आधुनिक विज्ञान [illegible]णि वैदिक दर्शनशास्त्र" या विषयावर ३ दिवस व्याख्याने दिली.

दि. १९ जानेवारी ६० या दिवशी या व्याख्यानमालेच्या समारोपाचे वेळी मुंबई राज्याचे राज्यपाल माननीय श्री. श्रीप्रकाश यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते. श्री. पु. य. देशपांडे यांचे व्याख्यानानंतर माननीय राज्यपालांनी व्याख्यानमालेचा समारोप केला. ही व्याख्यानमाला अतिशय [illegible]पणे पार पाडली.

* *

"महाभारत" व्याख्यानमाला—

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे 'महाभारता'वर १ ते १० फेब्रुवारी ६० पर्यंत साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांची "महा-भारताचा अधिनायक श्रीकृष्ण" या विषयावर उद्बोधक व्याख्याने झाली.

* *

गडकरी स्मारक समिति

कै. राम गणेश गडकरी यांचा ४१ वा स्मृतिदिन समारंभ

दरवर्षीप्रमाणे यावर्षी कै. राम गणेश गडकरी यांचा ४१ वा स्मृतिदिन समा-रंभ दि. २१ ते २३ जानेवारी ६० पर्यंत आयोजित करण्यात आला. यावेळी व्याख्यानासाठी सुप्रसिद्ध ग्रंथकार प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांना पाचारण कर-ण्यात आले होते. त्यांनी दि. २१ ते २३ या तारखांना सायंकाळी ६ वाजता अनुक्रमे "गडकऱ्यांच्या नाटकातील प्रणयसृष्टि", "गडकऱ्यांच्या नाटकातील

वाक्सृष्टि", आणि "गडकरी–काळ आणि कर्तृत्व" या विषयावर व्याख्याने दिली.

दि. २५–१–६० रोजी सावनेर मुक्कामी कै. राम गणेश गडकरी यांचा ज्या घरात मृत्यु झाला त्या ठिकाणी एक सभा घेण्यात आली. यावेळी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे व्याख्यान झाले. सुरवातीला कै. गडकरी यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात येऊन सावनेरकर मंडळींनी श्रद्धांजलि अर्पण केली. या कार्यक्रमासाठी नागपूरहून श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. पां. बा. गडकरी, श्री. प्रभाकर गडकरी ही मंडळी गेली होती. यावेळी त्यांनी कै. गडकऱ्यांच्या दहनभूमीचे जागी जाऊन श्रद्धांजलि अर्पण केली.

* *

नाट्य समिति

बाल नाट्योत्सवाचा कार्यक्रम

वि. सा. संघाचा पहिला बाल नाटचोत्सव दि. ३१–१–६० व दिनांक १–२–६० या दोन तारखांना धनवटे रंगमंदिरात करण्यात आला.

या बाल–नाटचोत्सवाचे उद्घाटन मुम्बई राज्याचे समाज कल्याणमंत्री श्री. ना. खं. तिरपुडे यांचे हस्ते करण्यात आले.

दि. ३१ ला चार नाटके सादर करण्यात आली होती व दि. १–२–६० ला तीन नाटकें आणि पाच नाटचछटा सादर करण्यात आल्या होत्या. या बाल-नाटचोत्सवात रंजन कला मंदिर व कलाभारती या संस्थांनी व सोमलवार हायस्कूल, सी. पी. अँड बेरार हायस्कूल व लोकांची शाळा या शाळांनी भाग घेतला.

दि. १–२–६० रोजी रात्री कार्यक्रम संपल्यानंतर निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतर नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते बक्षिस समारंभ झाला व पुढील उमेदवारांना बक्षिसे देण्यात आली.

नाटक—

पहिले बक्षिस—" नवे नाटक जुना गोंधळ "—सादरकर्ते–कलाभारती, नागपूर.

दुसरे बक्षिस—" नाटकाचे नाटक "—सादरकर्ते–लीला जोशी व चमू

तिसरे बक्षिस—"चिडीचा गुलाम"—सादरकर्ते–रंजन कलामंदिर, नागपूर.

सर्वोत्तम नाटचप्रयोगासाठी रंजनकलामंदिरातर्फे ठेवण्यात आलेला फिरता करंडक 'कलाभारती' या संस्थेला देण्यात आला.

दिग्दर्शन--

पहिले बक्षिस—श्री. गणेश सोळंकी (नवे नाटक जुना गोंधळ)

दुसरे बक्षिस—कु. लीला जोशी (नाटकाचे नाटक)

तिसरे बक्षिस—कु. नलिनी लोहारकर (चिडीचा गुलाम)

अभिनय--

पहिले बक्षिस—श्री. रंजन दारव्हेकर

दुसरे बक्षिस—श्री. अशोक तांबे व श्री. जगदीश सुकळीकर

तिसरे बक्षिस—कु. ज्योति मोघे

नाटयछटा--

पहिले बक्षिस—कु. उषा लोहारकर

दुसरे बक्षिस—श्री. अशोक मावकर

तिसरे बक्षिस—श्री. अशोक झाडे

बाल नाटयमहोत्सवाचा हा अभिनव कार्यक्रम यंदा प्रथमच सुरू करण्यात आला होता व तो अत्यंत यशस्वीपणे पार पडला.

खोलकुटे ढाल नाटयस्पर्धा

यावर्षी दरवर्षीप्रमाणे वि. सा. संघातर्फे खोलकुटे ढाल नाटयस्पर्धा घे. आली. यावर्षी "खोलकुटे ढाल" नागपूर महाविद्यालयाने मिळविली.

दि. ३१-१-६० रोजी बालनाटयोत्सवाचे उद्घाटनाचे वेळी समाजकल्याण-मंत्री श्री. ना. ग्वं. तिरपुडे यांचे हस्ते नागपूर महाविद्यालयाला खोलकुटे ढाल देण्याचा समारंभ घेण्यात आला.

* *

शासकीय नाटयकला प्रशिक्षण वर्ग

मुंबई राज्याच्या विदर्भ विभागीय शिक्षणखात्याचे वतीने प्राथमिक शिक्षकांना नाटयकलेचे शिक्षण देण्यासाठी एक नाटयशिबिर आयोजित करण्याची जबाबदारी वि. सा. संघाच्या नाटयसमितीकडे सोपविण्यात आली होती. त्यानुसार दि. २०-१-६० ते ३-२-६० पर्यंत वि. सा. संघाचे कै. गडकरी स्मारक सभागृहात वर्ग घेण्यात आले. या वर्गाचे उद्घाटन दि. २०-१-६० रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते करण्यात आले.

या नाटचकलेच्या वर्गाला नागपुरातील नाटचक्षेत्रातील तज्ज्ञ श्री. वा. वा. भोळे, श्री. श्री. ना. बनहट्टी, श्री. शंकरराव शास्त्री, श्री. सखारामपंत जोशी, श्री. बाळासाहेब भावे, श्री. वसंतराव सबनीस, श्री. मनोहरपंत परांजपे, श्री. मधुकर कुंडले, श्री. गोविंद रत्नपारखी, श्री. दि. ब. पंडित, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, श्री. शंकरराव कुळकर्णी आणि श्री. राजा पाठक यांनी शिकविण्याचे कार्य केले. वर्गाचे संचालन श्री. बाबुराव चिमोटे यांनी अत्यंत उत्साहाने व परिश्रमपूर्वक केले.

दि. २५–१–६० रोजी शिक्षण खात्याचे संचालक डॉ. आ. ग पवार यांनी ह्या प्रशिक्षण वर्गाला भेट देऊन रात्रौ ८–३० वाजता धनवटे रंगमंदिरात विद्यार्थ्यांसमोर नाटचकलेच्या वर्गाच्या आयोजनाविषयी उद्बोधक व्याख्यान दिले.

दि. २६–१–६० रोजी सकाळी सर्व वर्गातील विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग यांचे डॉ. आ. ग. पवार यांचे समवेत छायाचित्र काढण्यात आले.

दि. ३–२–६० रोजी हडस हायस्कूलचे खरे सभागृहात या नाटचवर्गाचा समारोप श्री. मो. अ. बंबावाले, उपसंचालक शिक्षणविभाग, विदर्भ यांचे अध्यक्षतेखाली झाला.

कै. नानासाहेब जोग स्मारकासाठी निधि

श्री. कार्यवाह—महाराष्ट्र हितकारी मंडळ, जमशेटपूर यांचेकडून रु. १५१–००ची देणगी मिळाली. या देणगीबद्दल वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

वि. सा. संघाचे नवीन आजीव सभासद

श्री. विष्णु गोविंद रत्नपारखी, पारस ५१–००

सौ. डॉ. पद्मावतीबाई थेरगावकर, नागपूर ५०–००

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास, नागपूर ५०–००

卐

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके			रु. पैसे
★१	निबंध परिमल		२-२५
२	सुमन संचय		१-२५
*३	मराठी गद्य	..	१-५०
*४	अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२-००
५	भारती (नाटक) नाना जोग	...	१-५०
६	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका—मालती बाई श्रीखंडे		०-७५
७	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेख संग्रह भाग २	...	३-००
८	The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ) ले. कै. डॉ. तु. ज. केदार		३-००
९	,, ,, ,,	(केवळ भाग ४)	१-५०
१०	डॉ केदार यांचे चरित्र	—ले. ज. रा. जोशी	५-००
११	नाटयमहोत्सव विशेषांक		३-००

कै. गडकरी वाङमयावरील प्रबंध

१२	वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	०-३१
१३	नाटककार गडकरी	—द. रा. गोमकाळे	०-३१
१४	गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार-कविभूषण	प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०-५०
१५	गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०-५०
१६	सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूलकर	०-५०
१७	गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०-५०
१८	गडकऱ्यांची नाटयशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०-५०
१९	"युगवाणी मासिक" —वार्षिक वर्गणी रु. ५	(वि. सा. संघाचे मुखपत्र)	

★ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

*ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत. बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ ह्या पत्यावर मिळतील.

अनुक्रमणिका

Statement about ownership and other particulars about news-paper (Yugwani) to be published in the first issue every year after the last day of February.

FORM IV

(See Rule 8)

Place of Publication :	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1
Periodicity of its Publication	Monthly.
Printer's Name	Shri Pandurang Narayan Banhatti.
Nationality	Indian
Address	Manager, Narayan Mudranalaya, Dhantoli, Nagpur-1
Publisher's Name	Shri Purushottam Diwakar Dhawale
Nationality	Indian
Address	Vice-President, Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1
Editor's Name	Shri P. Y. Deshpande
Nationality	Indian
Address	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1
Names and addresses of individuals who own the news-paper and partners or share-holders holding more than one per cent of the total capital.	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1

I, P. D. **Dhawale,** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dated 24-2-60

S/d. P. D. Dhawale

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तींला सभासद होता येते. नव्यानें सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु तीन आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते** —पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते**—एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**—पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**—अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ,नागपूर

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, यांनी वि. सा. संघाकरिता नारायण मुद्रणालय, घनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.